# वार्षिक अहवाल
# २०२३ – २०२४













## आदिम संस्कृती, अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र

**(रजि.नं. महा १५१९ /२०११/पुणे)**

त्रिमूर्ती भवन, जुन्नर फाटा, घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८ संपर्क – ९४०५८५३४७८

ई-मेल - adimsanstha2012@gmail.com संकेतस्थळ - adimresearch.org

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पान क्र. |
| --- | --- | --- |
| १ | प्रास्ताविक | ३ |
| २ | संस्थेविषयी माहिती | ४ - ६ |
| ३ | शिक्षण विषयक कार्यक्रम | ७ – २६ |
| | आरोग्य विषयक कार्य | २७ – ५५ |
| | संशोधनात्मक कार्य | ५६ – ६५ |
| | मदतीचे व इतर कार्य | ६६ – ६७ |
| | विशेषदिनानिमित्ताचे कार्यक्रम | ६८ – ७० |
| | वर्तमान पत्रातील कात्रणे | ७१ – ७३ |
| | आमचे भागीदार व समर्थक | ७४ |
| | पुढील वर्षातील नियोजन | ७५ |
| | संस्थेशी संपर्क साधा | ७६ |

# प्रास्ताविक

आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेचा सन २०२३-२४ चा वार्षिक अहवाल, प्रकाशित करताना संस्थेच्या कार्यकारी मंडळास नक्कीच आनंद होत आहे. जवळपास ११ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या संस्थेच्या वतीने अनेक रचनात्मक व विधायक कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.

संस्थेच्या मुख्य उद्देशानुसार संस्थेने आदिवासी, श्रमिक जनतेसाठी त्यांचे मुख्य प्रश्न समजून घेऊन त्यांच्यावर संशोधन करून काही दुर्लक्षित प्रश्न संशोधनाच्या पातळीवर शास्त्रीय पद्धतीने समोर आणण्याचा प्रयत्न केला. सन २०२३ -२४ मध्ये संस्थेने मुख्यतः शिक्षण, साक्षरता, आरोग्य विषयक कामे केली आहेत. याबरोबरच काही संशोधनात्मक काम सुद्धा यावर्षी करण्यात आले. या वर्षभरात झालेल्या कार्याचा संक्षिप्त रूपामध्ये वार्षिक अहवाल आम्ही सादर करत आहोत.

आपल्या सर्वांच्या सहकार्यातून आम्ही मागील वर्षभरात काम करू शकलो. आपणा सर्वांचे सहकार्य या पुढील काळातही आम्हाला आवश्यक आहे. याबरोबरच, संस्थेच्या वतीने पुढील काळामध्ये जे संशोधनात्मक व रचनात्मक कार्य केले जाणार आहे, त्या कार्याला आपल्या सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार व आपल्या सूचना व मार्गदर्शन पुढील काळात संस्थेला आवश्यक आहे.

आपलेच,

**कार्यकारी मंडळ**
आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र

# आमच्याविषयी

आदिवासी बोलीभाषा आणि संस्कृतीवर संशोधन करण्यासाठी व तिचे संवर्धन करण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती वाढवण्यासाठी आणि सामाजिक कार्याचा विस्तार करण्यासाठी मध्ये 'आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन आणि मानव विकास केंद्र' नावाची स्वतंत्र सामाजिक संस्था २०१२ स्थापन करण्यात आली. त्याची नोंदणी धर्मादाय आयुक्त कार्यालय, पुणे येथे करण्यात आली आहे. संस्था आंबेगाव तालुक्यात कायदा साक्षरता, पौढ साक्षरता, आरोग्य, शिक्षण व रोजगार या संदर्भात संशोधनात्मक, रचनात्मक काम आणि विशेषतः आदिवासी, मागासवर्गीय जमातींच्या प्रश्नावर संशोधन करते आहे. संस्थेने विविध रचनात्मक उपक्रम घेतलेले आहेत. यामध्ये पौढ साक्षरता वर्ग, आरोग्य शिबीरे, कायद्यासंदर्भात कार्यशाळा, गावांमध्ये ग्रंथालय उभारणी करणे इ. समावेश आहे.

**दृष्टी** - आदिवासी, दलित आणि उपेक्षित समुदायांच्या अद्वितीय सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी, ग्रामीण लोकसंख्येचे सक्षमीकरण करणे आणि समान समुदाय निर्माण करण्यासाठी शाश्वत सामाजिक आणि आर्थिक विकासास प्रोत्साहन देणे.


**मिशन** - आदिवासी बोली आणि संस्कृतीचे जतन करणे, कायदेशीर, आरोग्य आणि शैक्षणिक साक्षरतेला प्रोत्साहन देणे आणि समुदाय-चालित उपक्रमांद्वारे ग्रामीण विकासाला चालना देणे हे आमचे ध्येय आहे.

**मुल्ये** - मूल्ये ही मूलभूत तत्त्वे असतात. जी संस्थेच्या कृती, निर्णय आणि वर्तनाचे मार्गदर्शन करतात. ते विश्वास आणि वचनबद्धता प्रतिबिंबित करतात जे तिची संस्कृती, नातेसंबंध आणि एकूण मिशनला आकार देतात. आम्ही ग्रामीण, आदिवासी व मागास घटकांसाठी काम करत असताना नेहमी या मूल्यांना मार्गदर्शक मानून प्रत्येक कृतिकार्यक्रम संस्था करत असते.

- **समता** – सामाजिक, आर्थिक स्थिती, लिंग किंवा वांशिकतेची पर्वा न करता सर्वांसाठी सेवा, संसाधने आणि संधींमध्ये वाजवी प्रवेश सुनिश्चित करण्याचा आमचा नेहमी प्रयत्न असतो.
- **सहकार्य** -समान उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समुदाय, भागधारक आणि भागीदारांसह एकत्र काम करणे, संघकार्य आणि परस्पर आदर वाढविण्याचा आमचा नेहमी प्रयत्न असतो.
- **प्रामाणिकपणा** – संस्थेच्या कामकाजाच्या सर्व पैलूंमध्ये प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि नैतिक मानकांचे पालन केले जाते.
- **शाश्वतता** - पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या टिकाऊ असलेल्या पद्धतींचा प्रचार करून दीर्घकालीन कार्य आणि समुदाय परिणामांवर लक्ष केंद्रित केले जाते.
- **सक्षमीकरण** - समुदायांना त्यांच्या कर्तव्य, हक्क आणि अधिकारांसाठी सक्रिय भूमिका घेण्यास प्रोत्साहित केले जाते, त्यांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी साधने, ज्ञान आणि समर्थन प्रदान करण्यासाठी आमचा नेहमी प्रयत्न असतो.

- **नाविन्यता** - विकसित होत असलेल्या सामाजिक आव्हानांना तोंड देण्यासाठी नवीन कल्पना, पद्धती आणि तंत्रज्ञानामध्ये सतत सुधारणा आणि अवलंब करण्याचा आमचा नेहमी प्रयत्न असतो.
- **उत्तरदायित्व** - संस्था आणि सदस्यांना त्यांच्या कृती आणि वचनबद्धतेसाठी जबाबदार धरून, परिणाम साध्य आणि उद्दिष्टे पूर्ण झाल्याचे सुनिश्चित करण्याचा आमचा नेहमी प्रयत्न असतो.
- **आदर** - विविध पार्श्वभूमी, दृष्टीकोन आणि लोकांच्या संस्कृतीचे मूल्यमापन करणे आणि प्रत्येकाशी सन्मानाने आणि समजुतीने व्यवहार केले जातात.

## प्रशासकीय रचना



## संचालक मंडळ

| अ.क्र. | सदस्याचे नाव | | पद |
|---|---|---|---|
| १. | प्रा. शरद जनार्दन जावडेकर | | अध्यक्ष |
| २. | प्रा.हनुमंत तथा राजीव भीमराव जोशी | | उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. अमोल पोपट वाघमारे | | सचिव |
| ४. | गिरीश दगडूलाल गांधी | | सदस्य |
| ५. | सुवर्णा अशोक पेकारी | | सदस्य |
| ६. | प्रा.डॉ.हनुमंत लक्ष्मण भवारी | | सदस्य |
| ७. | ॲड .नाथा कुमाजी शिंगाडे | | सदस्य |

## कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | सदस्याचे नाव | शिक्षण | पद |
|---|---|---|---|
| १ | डॉ. अमोल वाघमारे | MA,SET,NET,PhD | सचिव |
| २ | प्रा. स्नेहल साबळे | MA,SET,NET, | व्यवस्थापक व प्रकल्प समन्वयक |
| ३ | समीर गारे | BA.MSW,SET,NET, | सहाय्यक व्यवस्थापक व प्रकल्प समन्वयक |
| ४ | अशोक जोशी | BA. | प्रकल्प समन्वयक |
| ५ | दिपाली खामकर | B.Com, M.Com, | कार्यालयीन सहाय्यक |
| ६ | राजू घोडे | MA. | क्षेत्रीय कार्यकर्ता |
| ७ | अविनाश गवारी | M.Com. | क्षेत्रीय कार्यकर्ता |
| ८ | बाळू काठे | MA.BEd | क्षेत्रीय कार्यकर्ता |

## शिक्षण विषयक कार्यक्रम

संस्थेने रोटरी क्लब ऑफ कोथरूड - पुणे, इनरव्हील क्लब ऑफ, निगडी प्राईड – पुणे , रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो यांच्या आर्थिक सहकार्यातून या वर्षभरात मोठ्या प्रमाणावर साक्षरता व शिक्षणविषयक उपक्रम राबविले आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून संस्था अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचली आहे. मागील ६ वर्षापासून पौढ शिक्षणामध्ये आपली उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेने या वर्षी आंबेगाव व मावळ तालुक्यात ५ साक्षरता वर्ग सुरु केले होते. ज्यामध्ये ६० पेक्षा अधिक महिला व पुरुष शिक्षणाचे धडे गिरवले.

यासोबतच घोडेगाव शहरात सुरु असलेली ज्ञानसरिता अभ्यासिका विद्यार्थी व युवकांसाठी एक हक्काचे व्यासपीठ ठरत आहे, संस्थेने २०२२ मध्ये सुरु केलेली अभ्यासिका ज्यामध्ये २५ विद्यार्थी क्षमता आहे, याच मधून मागील २ वर्षात २ विद्यार्थी राज्याच्या शासकीय सेवेत गेले आहेत. हि अभिमानस्पद बाब आहे. आत्तापर्यंत ४५ विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकेचा लाभ घेतला आहे.

संस्थेच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यातील फलोदे व जांभोरी या २ गावांत वय वर्षे ६ ते १२ वर्षाच्या मुलांसाठी बालमंच सुरु आहेत. ज्या माध्यमातून लहान मुलांमध्ये लिंगभाव समानता, वैज्ञानिक दृष्टीकोन,संविधानिक मुल्ये रुजली जात आहेत व त्यासोबतच मुलांच्या कला गुणांना वाव मिळत आहे. या बालमंचाच्या माध्यमातून हसत खेळत शिक्षण आणि यासोबतच जीवन कौशल्ये शिकविणे , त्यांना अभ्यासामध्ये गोडी निर्माण करणे, त्यांची बौद्धिक क्षमता वाढणे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळे लहान मुले टीव्ही आणि मोबाईल मध्ये न गुंतता त्यांना हा एक वेगळा पर्याय उपलब्ध झालेला आहे.

**१.साक्षरता वर्ग**
**२.ज्ञासारिता अभ्यासिका**
**३.बालमंच**
**४.आदिवासी साहित्य विषयक संदर्भ ग्रंथालय**
**५.ग्रामविकास दिनदर्शिका**

## १. साक्षरता वर्ग

प्रौढ साक्षरता वर्ग, आमच्या संस्थेचा एक प्रमुख उपक्रम, आवश्यक साक्षरता कौशल्यांसह प्रौढांना सक्षम करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रगती करत आहे. ९ महिने चालविला जाणारा हा कार्यक्रम प्रौढांना त्यांचे वाचन, लेखन आणि अंक कौशल्य सुधारण्यासाठी आवश्यक असलेली साधने प्रदान करण्यासाठी हा तयार करण्यात आलेला आहे, ज्यामुळे या प्रौढांचा समाजाच्या महत्वपूर्ण उपक्रमात सहभाग वाढण्यास मदत होते आणि त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्याची क्षमता वाढते.

**या वर्षातील प्रौढ साक्षरता वर्ग -**

**१. मतेवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८**

रोटरी क्लब ऑफ कोथरूड पुणे यांच्या सहकार्याने व संस्थेच्या स्थानिक संयोजनातून मतेवाडी(घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८ येथील आदिवासी समुदायाच्या वस्तीवर प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आलेला होता. या वर्गात एकूण १९ महिलांनी सहभाग नोंदविला होता. हा साक्षरता वर्ग ऑगस्ट, २०२३ ते मे,२०२४ असे जवळपास ९ महिने सुरु होता. या वर्गात सुप्रिया मते हि विद्यार्थिनीने अध्यापनाचे काम केले. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी समुदायातील होत्या, स्वतः च्या शेतातील काम, घरकाम व शेतमजुरी करून या महिला रात्री भरणाऱ्या वर्गात येत होत्या. या वर्गात अखेर पर्यंत १६ महिलांनी आपला साक्षरता अभ्यासक्रम पुर्ण करून साक्षर झाल्या. अभ्यासक्रम संपल्यावर या महिलांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली व उत्तीर्ण झालेल्या महिलांना रोटरी क्लब ऑफ कोथरूड पुणे व संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या साक्षरता वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरता व कायदेविषयक मार्गदर्शन, आरोग्य शिबिरे असे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी व महिलांच्या कायदेविषयक साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. बँकेचे व्यवहार , चेक स्लीप भरणे, रेशनिंग व्यवस्था इत्यादी बाबींची देखील माहिती देण्यात आली. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध दिनविशेष साजरे करून महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.



**कोळवाडी येथील साक्षरता वर्गातील महिलांना ॲनेमिया शिबिरामध्ये डोळे विषयक मार्गदर्शन करताना संस्थेचे समीर गारे**



**कोळवाडी येथे आयोजित डोळे तपासणी तपासणी करताना डॉ.राहुल जोशी**

## २. **संत तुकाराम नगर (सदुंबरे ) ता.मावळ जि.पुणे – ४१२ १०९**

रोटरी क्लब ऑफ कोथरूड पुणे यांच्या सहकार्याने व संस्थेच्या स्थानिक संयोजनातून संत तुकाराम नगर (सदुंबरे) ता. मावळ जि.पुणे – ४१२ १०९ येथील आदिवासी ठाकर समुदायाच्या वस्तीवर प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आलेला होता. या वर्गात एकूण १५ महिलांनी सहभाग नोंदविला होता. हा साक्षरता वर्ग ऑगस्ट, २०२३ ते मे, २०२४ असे जवळपास ९ महिने सुरु होता. या वर्गात अर्चना जाधव व सोनाली मेंढाळ या दोन विद्यार्थिनींनी अध्यापनाचे काम केले. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी ठाकर समुदायातील होत्या. येथील समुदायाला स्वतःची शेतजमीन नाही, त्यामुळे या महिलांना घरकाम व शेतमजुरी करून आपली उपजीविका करावी लागते. दिवसभर शेतमजुरी करून या महिला रात्री भरणाऱ्या वर्गात येत होत्या. या वर्गात अखेर पर्यंत १३ महिलांनी आपला साक्षरता अभ्यासक्रम पुर्ण करून साक्षर झाल्या. अभ्यासक्रम संपल्यावर या महिलांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली व उत्तीर्ण झालेल्या महिलांना रोटरी क्लब ऑफ कोथरूड पुणे व संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या साक्षरता वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरता व कायदेविषयक मार्गदर्शन,आर्थिक साक्षरता, आरोग्य शिबिरे असे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी व भारतीय संविधान याविषयी साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध दिनविशेष साजरे करून महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.






**संत तुकाराम नगर (सदुंबरे) येथील साक्षरता वर्गातील** **संत तुकाराम नगर (सदुंबरे) येथील**
**साक्षरता वर्गातील**
**महिलांची डोळ्यांची तपासणी करताना** **महिला व वस्तीमधील मुले चमचा लिंबू**
**खेळ खेळताना**

**३. खमसेवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८**

रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने व संस्थेच्या स्थानिक संयोजनातून खमसेवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८ येथील आदिवासी समुदायाच्या वस्तीवर प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आलेला होता. या वर्गात एकूण १८ महिलांनी सहभाग नोंदविला होता. हा साक्षरता वर्ग सप्टेंबर , २०२३ ते मे, २०२४ असे जवळपास ८ महिने सुरु होता. या वर्गात सुनंदा तुळशीराम डगळे यांनी स्वयंसेवक म्हणून अध्यापनाचे काम केले. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी समुदायातील होत्या. स्वतः च्या शेतातील काम, घरकाम व शेतमजुरी करून या महिला रात्री भरणाऱ्या वर्गात येत होत्या. या वर्गात अखेर पर्यंत १३ महिलांनी आपला साक्षरता अभ्यासक्रम पुर्ण करून साक्षर झाल्या. अभ्यासक्रम संपल्यावर या महिलांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली व उत्तीर्ण झालेल्या महिलांना रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो व संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या साक्षरता वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरता व कायदेविषयक मार्गदर्शन, आरोग्य शिबिरे असे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी व महिलांच्या कायदेविषयक साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. यामध्ये रोजगार हमी कायदा, सातबारा वाचन, रक्तपांढरी इत्यादीची देखील माहिती येथील महिलांना देण्यात आली. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध दिनविशेष साजरे करून महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.



**खमसेवाडी येथील साक्षरता वर्गातील महिलांच्या प्रगतीचा आढावा घेताना संस्थेचे सचिव डॉ.अमोल वाघमारे व व्यवस्थापक प्रा.स्नेहल साबळे**




**खमसेवाडी येथील साक्षरता वर्गातील महिलांना कायदे विषयक माहिती देताना घोडेगाव येथील पोलीस उपनिरीक्षक मा.किरण भालेकर**

**४. बुरसेवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८**

इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड पुणे यांच्या सहकार्याने व संस्थेच्या स्थानिक संयोजनातून बुरसेवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८ येथील आदिवासी समुदायाच्या वस्तीवर प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आलेला होता. या वर्गात एकूण १८ महिलांनी सहभाग नोंदविला होता. हा साक्षरता वर्ग ऑगस्ट, २०२३ ते मे, २०२४ असे जवळपास ९ महिने सुरु होता. या वर्गात प्रियंका अक्षय बुरसे यांनी स्वयंसेवक म्हणून अध्यापनाचे काम केले. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी समुदायातील होत्या. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी समुदायातील होत्या. स्वतः च्या शेतातील काम, घरकाम व शेतमजुरी करून या महिला रात्री भरणाऱ्या वर्गात येत होत्या. या वर्गात अखेर पर्यंत १५ महिलांनी आपला साक्षरता अभ्यासक्रम पुर्ण करून साक्षर झाल्या. अभ्यासक्रम संपल्यावर या महिलांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली व उत्तीर्ण झालेल्या महिलांना इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड पुणे व संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या साक्षरता वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरता व कायदेविषयक मार्गदर्शन, आरोग्य शिबिरे असे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी व महिलांच्या कायदेविषयक साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध दिनविशेष साजरे करून महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.



**बुरसेवाडी महिला साक्षरता विषयी पथनाट्याच्याद्वारे जाणीवजागृती करताना कर्वे समाजसेवा संस्थेचे विद्यार्थी व संस्थेचे पदाधिकारी**



**बुरसेवाडी येथे नवसाक्षरता संमेलनात गीत सादर करताना साक्षरता वर्गातील महिला**

**५. माळवाडी (बोरघर) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९**

रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो यांच्या सहकार्याने व संस्थेच्या स्थानिक संयोजनातून माळवाडी (बोरघर) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९ येथील आदिवासी समुदायाच्या दुर्गम वस्तीवर प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आलेला होता. या वर्गात एकूण १३ महिलांनी सहभाग नोंदविला होता. हा साक्षरता वर्ग सप्टेंबर, २०२३ ते जून, २०२४ असे जवळपास ९ महिने सुरु होता. या वर्गात प्रतीक्षा बांबळे या विद्यार्थिनींने अध्यापनाचे काम केले. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी समुदायातील होत्या. वर्गात शिक्षण घेणाऱ्या महिला या मुख्यतः आदिवासी समुदायातील होत्या. स्वतः च्या शेतातीलकाम, घरकाम व शेतमजुरी करून या महिला रात्री भरणाऱ्या वर्गात येत होत्या. या वर्गात अखेर पर्यंत ७ महिलांनी आपला साक्षरता अभ्यासक्रम पुर्ण करून साक्षर झाल्या. अभ्यासक्रम संपल्यावर या महिलांची मुलभूत साक्षरता परीक्षा घेण्यात आली व उत्तीर्ण झालेल्या महिलांना रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो व संस्थेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या साक्षरता वर्गात लेखन,वाचन, अंकगणित याबरोबरच आरोग्य साक्षरता व कायदेविषयक मार्गदर्शन,आर्थिक साक्षरता, आरोग्य शिबिरे असे विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये मुख्यतः महिलांच्या आरोग्य विषयी, रोजगार हमी कायदा, मधुमेह व उच्च रक्तदाब याविषयी साधन व्यक्तींनी मार्गदर्शन केले. याबरोबरच महिलांच्या काही खेळाच्या स्पर्धा घेऊन वर्गामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. साक्षरता वर्गामध्ये विविध दिनविशेष साजरे करून महापुरुषांची माहिती यानिमित्ताने देण्यात आली.




**माळवाडी येथील साक्षरता वर्गातील महिला व वस्तीमधील नागरिकांना मधुमेह व उच्चरक्तदाब याविषयी मार्गदर्शन ग्रामपंचायतीच्या करताना आरोग्य साथी रोहिदास फलके**



**साक्षरता वर्गातील महिला व वस्तीमधील नागरिकांना रोजगार हमी कायदा व योजनांची माहिती देताना बोरघर गावाचे उपसरपंच राजू घोडे**

**आलेख क्र. ०१**




**सारणी क्र. ०१**

| महिला | संख्या |
|---|---|
| प्रवेशित महिला | ८३ |
| नवसाक्षर महिला | ६४ |

यावर्षाच्या एकूण ५ ठिकाणच्या वर्गांमध्ये ८३ महिलांनी प्रवेश घेतला होता. यामधील ६४ (७७%) महिलांनी आपला साक्षरतेचा अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पुर्ण केला. त्यांना संस्थेच्या वतीने नवसाक्षर प्रमाणपत्र देण्यात आले.

- किमान १२ वी उत्तीर्ण असलेल्या महिलाच या महिलांना शिकवण्यासाठी निवडले गेलेलं होते.एकूण ५ पैकी ४ वर्गाच्या शिकविणाऱ्या स्वयंसेवक महिला या पदवी व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण पुर्ण केलेल्या होत्या.
- त्यांनी या नवसाक्षर महिलांना साक्षर करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले. अभ्यासक्रमाच्या बाहेरील देखील शिक्षण त्यांनी या वर्गातील प्रौढ महिलांना दिले.
- अभ्यासक्रमाच्या शेवटी ६४(७७%) महिलांनी आपला अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पुर्ण केला. अनेकांनी वाचन आणि लेखन सुधारले. या महिलांमध्ये शिक्षणामुळे आत्मविश्वास निर्माण झाला. दैनदिन आयुष्यात त्यांनी महत्वपूर्ण बदल करण्यास सुरुवात केली.
- प्रौढ साक्षरता वर्गाने सहभागींच्या जीवनावर खोलवर प्रभाव पाडला आहे, त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक करण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज केले आहे. अधिक साक्षर आणि सशक्त समुदायाला चालना देण्यासाठी आमची संस्था हा महत्त्वाचा कार्यक्रम सुरू ठेवण्यासाठी आणि त्याचा विस्तार करण्यासाठी वचनबद्ध आहे.

## या सकारात्मक बदलांच्या काही यशोगाथा –

- **शिकल्याने काय फायदा होतो** ? **हे शिकल्या नंतर कळते** !

मी सामान्य शेतकरी परिवारातून येत आहे व शेतकरी आहे. लहान पाणी घरातील आर्थिक परिस्थितीमुळे माझे शिक्षण झाले नाही. मला शिक्षणाची लहान पनापासून खुप आवड होती पण मला त्यावेळी शिक्षण घेता आले नाही. आपण निरक्षर असल्यावर आपली फसवणूक होते, हे खुप वेळा मी अनुभवले आहे. आपणही शिकलं पाहिजे, अस मनोमन वाटायचे. इतर लोकांसारख आपणही साक्षर झाले पाहिजे, अस अनेकदा मला वाटायचे.

आमच्या गावात साक्षरता वर्ग सुरु होणार आहे, हि माहिती वर्ग घेणाऱ्या व शिकवणाऱ्या प्रतीक्षा यांच्या कडून समजली . माझे घर माळवाडी पासून सुमारे २ किलोमीटर अंतरावर आहे . दररोज मला डोंगर चढून वर डोंगरवर असणाऱ्या माळवाडीला दररोज जायला लागायचे. मागील वर्षी मला अर्धांगवायू हा आजार झाला होता. त्या आजारावर मात करून मी पुन्हा आयुष्यात उभ राहिलो आहे. माझ्या घरी माझा मुलगा आणि मी आम्ही दोघेच राहत आहे. त्यामुळे शेतामधील आणि घरातील सर्व कामे आम्हालाच करावी लागत आहेत. हि सगळी कामे करून मी एकही दिवस न बुडवता दररोज रात्रीच्या वर्गात जायचो. शिक्षण घेण्याची इच्छा मला स्वस्त बसून देत नव्हती. मी अगदी पहिल्या दिवसा पासून साक्षरता वर्गात यायला लागलो. मी आजारी असल्यामुळे मला पाटीवर लिहताना अक्षर काढताना माझा हात थर थर करायचा. सुरवातीला माझ्या हाताला वळण येण्यासाठी काही वेळ गेला. मी शेतात कामाला गेल्यानंतर मी जेव्हा विसावा घेण्यासाठी बसलेला असायचो तेव्हा शाळेत शिकवलेल्या अभ्यासाचा दररोज सराव करायचो. काठीच्या साह्याने मी मातीत अक्षर गिरवायचो, अंक मातीत काढायचो , मुळाक्षरांचा दररोज सराव करायचो.

दररोज शाळेत गेल्यामुळे व नियमित सराव केल्यामुळे मला अक्षराची ओळख झाली आहे . मी घेतलेल्या शिक्षणाचा मला आता फायदा होत आहे. आज मला शिक्षणामुळे वाचन करता येते. दैनदिन व्यवहार करता येतो, बँकेतील चलनाची स्लीप मी स्वतः भरतो, ग्रामपंचायत, रोजगार हमी कायदा यांची मला ओळख झाली आहे. शिकल्यामुळे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

- **गोविंद महादू फलके (वय -५५) मु .माळवाडी (बोरघर) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९**

- **मला झाली आर्थिक साक्षरतेची झाली ओळख** !

मागील आठ महिन्यापासून आमच्या कडे रात्रीची शाळा (प्रौढ साक्षारता वर्ग) सुरु झाला. . साक्षरता वर्ग सुरु झाल्याची माहिती मला सुप्रिया कडून समजली. साक्षरता वर्गात शिकायला जाण्यासाठी मला माझ्या परिवाराने पाठींबा दिला होता .

हा वर्ग सुरु झाल्यापासून आम्ही या रात्रीच्या शाळेत जायला सुरुवात केली. साक्षरता वर्ग सूरू झाल्यापासून आमच्या गावात आरोग्य शिबिरे घेण्यात आली. त्यामध्ये डोळे तपासणी शिबीर, हिमोग्लोबिन तपासणी शिबीर सुप्रिया च्या पुढाकाराने आमच्या इथे ही शिबिरे आमच्या गावात घेण्यात आली. आम्ही वर्गात नियमित गेल्यामुळे हळू हळू शिकायला लागलो. क, ख, ग कशाला म्हणतात ? हे माहिती नव्हते. पण आता वाचता यायला लागले आहे. बँकेतून पैसे काढता येतात. मला सही करता येते. अनेक शासकीय योजनेची माहिती झाली आहे .

मला अगोदर २० रु. नोट हि १० रुपयाची वाटायची पण आता २० रुपयाची नोट ही २० रुपयाची हे समजू लागले आहे. शाळेची ओढ लागून राहायची केव्हा शाळा चालू होईल ? असे वाटायचे.

या वर्गात शिकताना मला काही अडचण आली , तर मी वर्गात असताना सुप्रिया ला विचारायचे . घरी गेल्यानंतर माझ्या नाततोंडाना विचारायचे एखाद गणित कसे सोडवायचे, लिहायचं कस ? वाचायचं कस? आज मला लिहता यायला लागले आहे. वाचता येत आहे, सही करता येते. शिक्षण घेतल्या मुळे आनंद वाटतो आहे. आत्ता माझ्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला आहे. अक्षरांची ओळख झाली आहे , अंकाची ओळख झाली आहे. दोन - पाच रुपयाला आत्ता कोणी मला फसवणार नाही, बसची पाटी ओळखता येते आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे माझ्यात आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

आधी हाताला वळण नव्हते पण आता वळण लागले आहे. मी माझ्या घरी कधी रांगोळी काढली नाही पण शाळेत आनंदाने रांगोळी काढली आहे. आमच्या वर्गात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली तेंव्हा त्यामुळे त्यांनी महिलांसाठी केलेल्या कार्याची ओळख झाली. लिहिता - वाचता यायला लागल्यामुळे घरातील मुलांनी माझे कौतुक केले .या साक्षरता वर्गातून मला खुप काही शिकायला मिळाले आहे.

- **धोंडाबाई लक्ष्मण मते (वय -६५) कोळवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८**

## २. ज्ञानसरिता अभ्यासिका

ग्रंथालये आणि अभ्यासिका आवश्यक आहेत कारण ती ज्ञान आणि संस्कृतीचे प्रवेशद्वार म्हणून काम करतात आणि समाजात मूलभूत भूमिका बजावतात. अभ्यासिका ही सर्वसमावेशक जागा आहे जिथे सर्व वयोगटातील आणि पार्श्वभूमीचे लोक शैक्षणिक उपक्रमांमध्ये , समुदायाला आणि सामाजिक परस्परसंवादाला चालना देऊ शकतात. थोडक्यात शिक्षण, समानता आणि समाजाच्या कल्याणासाठी अभ्यासिका महत्त्वाची आहे.

याच पार्श्वभूमीवर घोडेगाव येथे २०२२ रोजी संस्थेने एक जागा भाडेतत्वावर घेऊन, या ठिकाणी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करण्यात आलेली आहे. घोडेगाव हे तालुक्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी एकही अभ्यासिका नसल्याने, विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती. ही गैरसोयी लक्षात घेऊन संस्थेने ही अभ्यासिका सुरू केलेली आहे. यासाठी ललित कला मंदिर, सार्वजनिक विश्वस्त निधी,पुणे , सत-करम फाउंडेशन,मुंबई व संस्थेच्या विविध हितचिंतकांनी यासाठी विशेष सहकार्य केले. या अभ्यासिकेत विद्यार्थ्यांकडून मासिक ३०० रुपये फी घेऊन, त्यांना पुस्तके, इंटरनेट, पाण्याची व्यवस्था, स्वतंत्र डेस्क, दैनदिन घडामोडी साठी वृत्तपत्रे या सुविधा पुरविल्या जातात. व विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात येतात.या **मागील वर्षी १ विद्यार्थी पोलीस शिपाई पदी तर यावर्षी एका विद्यार्थ्याची कृषी सेवक पदी निवड झालेली आहे**.
या वर्षात ४५ विद्यार्थ्यांनी या अभ्यासिकेचा लाभ घेतला आहे. या अभ्यासिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आलेली आहेत.




**अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.महेश गारगोटे**



**अभ्यासिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना घोडेगाव पोलीस स्टेशन चे पोलीस उपनिरीक्षक मा.किरण भालेकर**

**आलेख क्र. ०२**




**सारणी क्र. ०२**

| **महिला** | **संख्या** |
|---|---|
| प्रवेशित विद्यार्थी | ४५ |
| शासकीय सेवेत रुजू झालेले विद्यार्थी | ०१ |

यावर्षी प्रवेशित ४५ विद्यार्थ्यांपैकी १ (२%) विद्यार्थी हा शासकीय सेवेत रुजू झालेला आहे.

- पुस्तके आणि शांत, वातावरण पूरक जागा उपलब्ध असल्याने, विद्यार्थी स्पर्धा परीक्षांची चांगली तयारी करू शकतात, त्यांच्या करिअरच्या शक्यता या अभ्यासिकेमुळे वाढत आहेत.
- घोडेगाव सारख्या शहरात जिथे १० किमी पेक्षा अंतरावर कुठेच अभ्यासिका उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना हे एक हक्काचे स्थान उपलब्ध झाले आहे.
- मासिक ३०० /- रुपये फी जवळपास सर्वांना भरणे शक्य असल्याने किंवा ज्यांना भरता येणे शक्य नाही, त्यांना इथे मोफत प्रवेश दिला जातो. त्यामुळे कुणालाही येथे येण्यापासून आणि अभ्यास करण्यापासून वंचित ठेवले जात नाही.

## ३. बालमंच

लहान मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला जावा व त्यासोबतच मुलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी. संस्थेच्या वतीने बालमंच या प्रकल्पाचे आयोजन करण्यात आले होते. या बालमंचाच्या माध्यमातून हसत खेळत शिक्षण आणि यासोबतच जीवन कौशल्ये शिकविणे , त्यांना अभ्यासामध्ये गोडी निर्माण करणे, त्यांची बौद्धिक क्षमता वाढणे हा मुख्य उद्देश प्रकल्प राबविण्याविषयीचा होता. ज्याद्वारे मुले टीव्ही आणि मोबाईल मध्ये न गुंतता, त्यांना हा एक वेगळा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. तालुक्यातील फलोदे व जांभोरी येथे हे बालमंच सुरु करण्यात आले होते.


### अ. चाफा बालमंच, फलोदे

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील फलोदे येथे संस्थेच्या वतीने बालमंच सुरु करण्यात आलेला होता. ऑक्टोबर २०२३ ते एप्रिल २०२४ या दरम्यान या बालमंचाचे नियमित आयोजन करण्यात येत होते. या बालमंचातील मुलांना याच गावातील रेखा शेळके यांनी संस्थेच्या वतीने प्रशिक्षणाचे कार्य केले. या बालमंचात एकूण २३ मुले सहभागी होती.

या बालमंचाच्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या द्वारे विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कार्य करण्यात आले. यामाध्यमातून मुख्यतः

- त्यांच्या अभ्यासक्रमातील पाठ, गोष्टी व कविता हे नाटकाच्या माध्यमातून शिकविणे, यामध्ये मुलांनाच वेगवेगळी पात्र साकारायला सांगितले जात असे. मुलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग यामध्ये राहत होता.
- विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, गणित आदी विषयांची आवड निर्माण व्हावी, वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला जावा, चिकित्सक वृत्ती अंगी यावी, कुतूहल वाटावे यासाठी विज्ञानाची गाणी (उदा. पाण्यात मासा राहतो कसा ? ) , गणिताचे विविध खेळ या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवले जात होते.
- विविध दिनविशेष यानिमित्ताने साजरे करण्यात येत असत. यामाध्यमातून देखील विद्यार्थ्यांना माहिती दिली जात होती.

**आलेख क्र. ०३**




**सारणी क्र. ०३**

| इयत्ता | संख्या |
|---|---|
| इ. १ ली. | ०४ (१७%) |
| इ. २ री. | ०८ (३५%) |
| इ. ३ री. | ०७ (३१%) |
| इ. ४ थी. | ०४ (१७%) |
| **एकूण** | **२३ (१००%)** |

या बालमंचामध्ये गावात राहणारे इ.१ ली. चे ४ (१७%), इ. २ री.चे ८ (३५%) , इ. ३ री.चे ७ (३१%) व इ.४ थी. चे ४ (१७%) विद्यार्थ्यांचा सहभाग होता. इ.२ री. व इ. ३ री. मधील मुलांचा सर्वात जास्त सहभाग या बालमंचामध्ये होता.





**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरीनिर्वान दिन साजरा करताना बालमंचातील मुले**







**चाफा (फलोदे) बालमंचामध्ये विविध उपक्रमात व्यस्त विद्यार्थी**


### आ. जास्वंद बालमंच, जांभोरी (नांदूरकीचीवाडी)

आंबेगाव तालुक्यातील आदिवासी भागातील जांभोरी येथील नांदुरकिचीवाडी येथे संस्थेच्या वतीने दुसरा बालमंच सुरु करण्यात आलेला होता. ऑक्टोबर २०२३ ते एप्रिल २०२४ या दरम्यान या बालमंचाचे नियमित आयोजन करण्यात येत होते. संस्थेच्या वतीने गाव पातळीवर मुलांसाठी सुरु केलेला हा प्रकल्प अतिशय महत्वाचा ठरला.

या बालमंचातील मुलांना याच गावातील वैशाली केंगले यांनी संस्थेच्या वतीने प्रशिक्षणाचे कार्य केले. या बालमंचात एकूण १६ मुले सहभागी होती. या बालमंचाच्या माध्यमातून विविध उपक्रमांच्या द्वारे विद्यार्थ्यांना शिकवण्याचे कार्य करण्यात आले. यामाध्यमातून मुख्यत:

- मुलांच्या आवडीनुसार त्यांना विविध उपक्रम देणे त्यांच्याकडून ते पुर्ण करून घेणे. उदा. वाचन, चित्र काढणे, मातीच्या वस्तू बनविणे, कागदाच्या वस्तू बनविणे.
- त्यांच्या अभ्यासक्रमातील पाठ, गोष्टी व कविता हे नाटकाच्या माध्यमातून शिकविणे, यामध्ये मुलांनाच वेगवेगळी पात्र साकारायला सांगितले जात असे. मुलांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग यामध्ये राहत होता.
- विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान, गणित आदी विषयांची आवड निर्माण व्हावी, वैज्ञानिक दृष्टीकोन रुजला जावा, चिकित्सक वृत्ती अंगी यावी, कुतूहल वाटावे यासाठी विज्ञानाची गाणी (उदा. पाण्यात मासा राहतो कसा ? ) , गणिताचे विविध खेळ या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवले जात होते.
- विविध दिनविशेष यानिमित्ताने साजरे करण्यात येत असत. यामाध्यमातून देखील विद्यार्थ्यांना माहिती दिली जात होती.
- विज्ञानाचे प्रयोग देखील या माध्यमातून मुलांना शिकवले जात होते. सोबतच पंचतंत्रातील गोष्टी देखील यामाध्यमातून शिकवल्या जात होत्या. मुलांना एक विवेकी शिकवण देण्याचा हा उपक्रम होता.

**आलेख क्र. ०४**




**सारणी क्र. ०४**

| इयत्ता | संख्या |
|---|---|
| इ. १ ली. | ०४ (२५%) |
| इ. २ री. | ०२ (१२%) |
| इ. ३ री. | ०३ (१९%) |
| इ. ४ थी. | ०४ (२५%) |
| इ. ५ वी. | ०१ (६%) |
| इ. ६ वी. | ०२ (१३%) |
| **एकूण** | **१६ (१००%)** |

या बालमंचामध्ये गावात राहणारे इ.१ ली. चे ४ (२५%), इ. २ री.चे २ (१२%) , इ. ३ री.चे ३ (१९%) , इ.४ थी. चे ४ (२५%) , इ.५ वी.चे १ (६%) व इ.६ वी. चे २ (१३%) विद्यार्थ्यांचा सहभाग होता. इ. १ ली व इ. ४ थी. मधील मुलांचा सर्वात जास्त सहभाग या बालमंचामध्ये होता.



**जास्वंद (जांभोरी) बालमंचामध्ये विविध उपक्रमात व्यस्त विद्यार्थी**



**जास्वंद (जांभोरी) बालमंचामध्ये गणिते सोडविताना विद्यार्थी, सावित्रीबाई फुले जयंती साजरा करताना गावातील महिला व विद्यार्थी**

- टीव्ही आणि मोबाईल फोनला पर्याय उपलब्ध करून दिल्याने लहान मुलांचा स्क्रीन टाइम कमी झाला. जो मुलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे. यामुळे लक्ष वेधून घेणे, चांगली झोप लागणे आणि एकूणच सर्वांगीण विकासात महत्वपूर्ण योगदानाची भर यामुळे टाकली गेली.
- येथील शिकवण्याच्या पद्धतीमुळे मिळणारा वैज्ञानिक दृष्टिकोन मुलांना तर्कशील विचार, सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करण्यास मदत करणारा ठरला आहे.
- लहान वयातच शिकण्याची आणि जीवन कौशल्याची आवड निर्माण होणे , हा या प्रकल्पाचा दीर्घकालीन फायदा आहे. मुले त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याची, विविध आवडी जोपासण्याची आणि चांगल्या व्यक्ती बनण्याची अधिक शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.
- मुलांना शाळेत येणाऱ्या अभ्यासातील अडचणी दूर होण्यास मदत झाली व मुलांचा पाया मजबूत होण्यास बालमंच उपयुक्त ठरला आहे.
- मुलांच्या मनातील भीती नाहीशी झाली आहे. पूर्वी कोणत्याही उपक्रमात सहभागी न होणारे विद्यार्थी लक्षणीयरित्या सक्रिय झाले.

- मुलांची शिक्षणाची आवड, त्यांची नैतिक मूल्ये यांतील बदल बघून पालकांमध्ये बालमचांविषयी सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.
- मुलांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे, सकारात्मक विचार करु लागले आहेत.
- कल्पना क्षमतेत वाढ झाली, यासोबतच अनेक मुले हि कलेमध्ये पारंगत झालेली आहेत. त्यांच्या सुप्त गुणांना येथे वाव मिळाला आहे.

एकंदरीत, बालमंच प्रकल्पामुळे मुलांच्या शैक्षणिक अनुभवांचे परिवर्तन होण्यास मदत झाली आहे. स्क्रीन अवलंबित्व कमी झाल्यामुळे मुलांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत आहे. ज्यामुळे त्यांच्या जीवनावर आणि समुदायांवर सकारात्मक आणि चिरस्थायी प्रभाव पडत आहे.

## ४. आदिवासी साहित्य विषयक संदर्भ ग्रंथालय

आदिवासी समुदायाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि साहित्यिक योगदान याचे जतन, संवर्धन आणि अभ्यास करण्याच्या हेतूने हा उपक्रम संस्थेच्या वतीने हाती घेण्यात आलेला आहे. संस्थेच्या प्रमुख उदिष्ट आणि ध्येय गाठण्यासाठी हि सुरुवात संस्थेच्या वतीने करण्यात आलेली आहे.
हे संदर्भ ग्रंथालय सुरु करण्यामागील उद्देश -

- आदिवासी समुदायांच्या साहित्यकृती, मौखिक परंपरा, लोककथा आणि ऐतिहासिक दस्तऐवज यांचे रक्षण करणे, त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे भावी पिढ्यांसाठी जतन व संवर्धन करणे.
- आदिवासी समाजातील अद्वितीय दृष्टीकोन, कथा आणि ज्ञान प्रणाली अधोरेखित करून, व्यापक प्रेक्षकांमध्ये आदिवासी साहित्याची जाणीव आणि कौतुक वाढवणे.
- आदिवासी साहित्य, संस्कृती आणि इतिहासाचा अभ्यास करण्यात स्वारस्य असलेले विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षणतज्ञ यांच्यासाठी शैक्षणिक संसाधन म्हणून काम करणे, त्यांना साहित्याच्या सर्वसमावेशक संग्रहात प्रवेश प्रदान करणे.
- आदिवासी लेखक, कवी आणि कथाकारांना त्यांचे कार्य सामायिक करण्यासाठी व्यासपीठ देऊन सशक्त करणे, त्याद्वारे त्यांच्या आवाज आणि दृष्टीकोनांना वाङ्मयीन परिदृश्यात प्रोत्साहन देणे.
- आदिवासी समुदायांच्या साहित्यिक योगदानातून गैर-आदिवासी व्यक्तींना सहभागी होण्याच्या आणि त्यातून शिकण्याच्या संधी निर्माण करून आंतरसांस्कृतिक संवाद आणि समज वाढवणे.
- आदिवासी साहित्याशी संबंधित संशोधन आणि दस्तऐवजीकरण प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी, शैक्षणिक क्षेत्रात योगदान देणे आणि आदिवासींचे ज्ञान संवर्धन करणे आणि अभ्यासले जाईल याची खात्री करणे.
- धोरणकर्ते, कार्यकर्ते आणि आदिवासी अधिकार, शिक्षण आणि सांस्कृतिक संरक्षणाशी संबंधित मुद्द्यांवर काम करणाऱ्या व्यक्तींसाठी एक मौल्यवान संसाधन प्रदान करणे.
- आदिवासी साहित्याचे डिजिटायझेशन करण्यासाठी, ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे ते व्यापक प्रेक्षकांपर्यंत प्रवेश करण्यायोग्य बनवण्यासाठी आणि या सांस्कृतिक संसाधनांच्या प्रवेशामध्ये सर्वसमावेशकता सुनिश्चित करण्यासाठी संधी शोधणे .
- आदिवासी आणि बिगर आदिवासी लेखक, कवी आणि कलाकारांच्या नवीन पिढ्यांना आदिवासी साहित्य परंपरांची समृद्धता आणि विविधता प्रदर्शित करून प्रेरित करणे.

एकूणच आदिवासी साहित्यावरील संदर्भ ग्रंथालयाची स्थापना या माध्यामतून आदिवासी समुदायांच्या साहित्यिक वारशाचा सन्मान करणे आणि ते साजरे करणे, त्यांची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी योगदान देणे आणि साहित्य जगतात त्यांच्या योगदानाची अधिक समज आणि प्रशंसा करणे हा संस्थेचा मानस आहे.

या संदर्भ ग्रंथालायचे उद्घाटन दि. ९ ऑगस्ट, २०२३ जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने संस्थेच्या वतीने घोडेगाव येथे संस्थेच्या कार्यालयात करण्यात आले. या संदर्भ ग्रंथालयाचे उद्घाटन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगाव चे प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड, बी.डी.काळे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांच्या हस्ते झाले.
या उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपले मत व्यक्त केले. यावेळी बोलताना बळवंत गायकवाड म्हणाले कि, 'आदिवासी विषयक जे संदर्भ ग्रंथालय सुरु होत आहे, हा अत्यंत महत्वपूर्ण उपक्रम आहे. या संदर्भ ग्रंथालाय्साठी आदिवासी विकास विभागाच्या वतीने सहकार्य करण्यात येईल.'

प्रो.डॉ. वाल्हेकर म्हणाले कि, ‘जागतिक आदिवासी दिन अशा प्रकारे साजरा होणे हे खूप अभिनंदनीय आहे. आदिवासी विषयक संदर्भ ग्रंथालय हे आदिवासींवर अभ्यास करणाऱ्या अभ्यासक, संशोधक नक्कीच उपयुक्त ठरेल.’

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समीर गारे, सूत्रसंचालन बाळू काठे व आभार रोशन पेकारी यांनी मांडले. या वेळी संस्थेचे सचिव डॉ.अमोल वाघमारे, प्रा.स्नेहल साबळे, अखिल भारतीय किसान सभेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष राजू घोडे, एसएफआय महाराष्ट्र चे राज्य समिती सदस्य संदीप मरभळ, पुणे जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी, रुपाली काठे आदी उपस्थित होते.







**घोडेगाव येथे आदिवासी साहित्य विषयक संदर्भ ग्रंथालय उद्घाटन कार्यक्रमाचे काही क्षणचित्रे यावेळी पहिल्या फोटोमध्ये उद्घाटन करताना (डावीकडून) प्रो.डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर (प्राचार्य, बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव ),**
**मा.बळवंत गायकवाड (प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र.कार्यालय घोडेगाव ) .**

**तिसऱ्या फोटोमध्ये बोलताना संस्थेचे सचिव ॲड.डॉ. अमोल वाघमारे**

या आर्थिक वर्षात नुकतीच या ग्रंथालायची स्थापना करण्यात आलेली असुन, या ग्रंथालयामध्ये देशातील विविध ठिकाणांहून पुस्तके मागविण्यात येत आहेत. आत्तापर्यत ८६ पुस्तके जमा करण्यात आलेली आहेत. यासाठी राजगुरुनगर (खेड) येथील पुस्तक मैत्री च्या प्रा.मयुरी भवारी यांनी सहकार्य केलेले आहे. यासोबतच प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड यांनीही सहकार्य केलेले आहे.

## ५. ग्रामविकास दिनदर्शिका

संस्था गेल्या १२ वर्षांपासून पुणे जिल्ह्यात कायदा साक्षरता, प्रौढ साक्षरता, संशोधन, प्रशिक्षण, आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यावर लक्ष केंद्रित करून काम करत आहे. शाश्वत गाव विकासाची महत्त्वाची गरज ओळखून, संस्थेने 'ग्राम विकास दिनदर्शिका – २०२४ ' तयार करण्यात आली. शाश्वत विकास साधण्यासाठी गावकऱ्यांना, ग्रामपंचायत च्या लोकप्रतिनिधींना  मार्गदर्शन करण्यासाठी डिझाइन केलेले सर्वसमावेशक दिनदर्शिका आहे.

हि दिनदर्शिका सुरू करण्यामागील प्राथमिक उद्दिष्ट ग्रामीण समुदायांना शाश्वत विकासासाठी आवश्यक ज्ञान आणि साधनांसह सक्षम करणे हा आहे. दिनदर्शिका एक शैक्षणिक संसाधन म्हणून काम करते जे ग्रामस्थांना ग्रामीण विकासाच्या विविध पैलूंवर व्यावहारिक माहिती प्रदान करते, जसे की आरोग्य आणि स्वच्छता जागरूकता आणि कायदेशीर साक्षरता. हे गावाच्या सर्वांगीण वाढीसाठी महत्त्वाचे घटक म्हणून शिक्षण आणि कौशल्य विकासाचे महत्त्व देखील सांगते.

'ग्रामविकास दिनदर्शिका' ही यावर्षी पहिल्यांदा संस्थेने सुरू केली. यावर्षी पुणे व रायगड जिल्ह्यातील २० गावांमध्ये तब्बल ४ हजार प्रति विकल्या गेल्या. हि दिनदर्शिका अनेक गावांसाठी एक मौल्यवान संसाधन बनली आहे. याने विकासाच्या महत्त्वाच्या क्षेत्रांबद्दल जागरुकता यशस्वीपणे वाढवली आहे, गावकऱ्यांना त्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या समुदायाच्या दीर्घकालीन टिकावासाठी योगदान देणारे माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम केले आहे. या दिनदर्शिकेने सामूहिक जबाबदारीची भावना देखील वाढवली आहे, ज्यामुळे ग्रामस्थांना आपली ग्रामपंचायत, पर्यावरण संवर्धन, आरोग्य, रोजगार आणि शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले आहे.
एकूणच, 'ग्राम विकास दिनदर्शिका – २०२४ ' हे सर्वांगीण मानवी विकासाला चालना देण्याच्या ध्येयाच्या अनुषंगाने गावांना आणि गावातील नागरिकांना अधिक शाश्वत आणि समृद्ध भविष्याकडे मार्गदर्शित करण्यासाठी एक महत्त्वाचे साधन असल्याचे सिद्ध झाले आहे.

आदिम संस्कृती अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र आंबेगाव या संस्थेच्या वतीने, गावविकास आणि ग्रामपंचायत विषयी, माहिती देणाऱ्या 'ग्रामविकास दिनदर्शिका – २०२४' चे प्रकाशन, आंबेगाव तालुका पंचायत समितीच्या, गटविकास अधिकारी मा.प्रमिला वाळूंज यांच्या हस्ते घोडेगाव येथे पार पडले.

संस्था पुणे जिल्ह्यामध्ये आणि महाराष्ट्रातील काही भागांमध्ये मागील १२ वर्षापासून कायदा साक्षरता, पौढ साक्षरता, संशोधन,प्रशिक्षण, आरोग्य, शिक्षण व रोजगार या विषयांवर वेगवेगळे काम करत आहे.संस्थेच्या वतीने प्रथमच, ग्रामविकासाची माहिती देणारे आणि ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या माध्यमातून गावाचा शाश्वत विकास कसा साधू शकतो या संदर्भात माहिती देणारी, 'ग्रामविकास दिनदर्शिका – २०२४' तयार करण्यात आली होती. या दिनदर्शिकेत गाव विकास आरखडा कसा तयार करावा ?, पेसा कायदा -१९९६, वनहक्क कायदा, रोजगार हमी कायदा, माहिती अधिकार कायदा, आश्रमशाळा संहिता,जन आरोग्य समिती, आरोग्य विषयक योजना या व इतर गावच्या सबंधित विषयांची माहिती देण्यात आलेली आहे. यामध्ये वरील कायद्यांविषयी ठळक माहिती आहे. तसेच कायद्यांच्या सविस्तर माहितीसाठी कॅलेंडर वरती QR कोड दिलेले आहेत. हे स्कॅन करून प्रत्येक नागरिकास मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत अगदी सोप्या पद्धतीने सविस्तर कायदा घरबसल्या वाचता येऊ शकतो.

**'गाव विकासासाठी उपयुक्त अशी हि दिनदर्शिका आहे, व यामध्ये गावच्या सबंधित, कायद्यांची माहिती असल्याने ही दिनदर्शिका जरूर नागरिकांना उपयुक्त ठरेल'**

- मा.प्रमिला वाळूंज (गटविकास अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव



डावीकडून मा. प्रमिला वाळूंज, गटविकास अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव व मा. तुषार पवार, तालुका आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते ग्रामविकास दिनदर्शिकेचे प्रकाशन





ग्रामविकास दिनदर्शिका वाचन करताना पंचाळे खुर्द येथील नागरिक




तालुक्यातील आरोग्य वर्धिनी उपकेंद्रांना संस्थेच्या वतीने ग्रामविकास दिनदर्शिका भेट देण्यात आली. आरोग्य वर्धिनी उपकेंद्र, बोरघर






## आरोग्य विषयक कार्य

विविध लक्ष्यित आरोग्य उपक्रमांद्वारे जिथे सेवा पोहचली जात नाही, त्या सेवा नसलेल्या समुदायांसाठी आरोग्य आणि त्यांचे राहणीमान सुधारण्यासाठी संस्था दृढपणे वचनबद्ध आहे. चांगले आरोग्य हा मूलभूत मानवी हक्क आणि शाश्वत विकासाचा आधारस्तंभ आहे हे ओळखून, या समुदायांसमोरील आरोग्यविषयक आव्हानांना तोंड देण्यासाठी आमचे प्रयत्न आहेत. आमच्या आरोग्य कार्यामध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, वैद्यकीय उपचार, आरोग्य शिक्षण आणि समुदाय सशक्तीकरण यासह उपक्रमांचा समावेश आहे. स्थानिक आरोग्य सेवा प्रदाते, शासकीय यंत्रणा आणि समुदायातील नेते यांच्याशी सहयोग करून, आम्ही आरोग्यासाठी सर्वांगीण आणि शाश्वत दृष्टीकोन तयार करण्याचा प्रयत्न करतो. जो प्रवेशयोग्यता, समानता आणि दर्जेदार काळजीला प्राधान्य देतो.
संस्थेने या आर्थिक वर्षात पुढील आरोग्य विषयक उपक्रम हाती घेतले होते. –

**१.जन आरोग्य समितीच्या माध्यमातून आरोग्य वर्धिनी केंद्रातील आरोग्य सेवा-सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने समुदायाचा सहभाग वाढवणे**
**२.पोषणयुक्त व विषमुक्त आहार अभियान (परसबाग प्रकल्प)**
**३.निसर्गोपचार पद्धतीची आरोग्य शिबिरे**
**४.मोफत डोळे तपासणी शिबीर**

## १. जन आरोग्य समितीच्या माध्यमातून आरोग्य वर्धिनी केंद्रातील आरोग्य सेवा-सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने समुदायाचा सहभाग वाढवणे

**प्रस्तावना**

'आयुष्मान भारत (आभा)' कार्यक्रमाअंतर्गत, गावस्तरावरील आरोग्य उपकेंद्र (Sub center) आणि प्राथमिक आरोग्य केंद्र (पी.एच.सी) चे सर्वांगीण आरोग्यसेवा देण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये (Comprehensive Primary Health Center - CPHC) रूपांतर झाले. महाराष्ट्रात मार्च २०२२ पर्यंत सर्वच स्थानिक आरोग्य संस्थांचे रूपांतर आरोग्यवर्धिनी केंद्र म्हणजे 'हेल्थ अँड वेलनेस सेंटर' (HWC) केले गेले. जानेवारी २०२४ नंतर सर्व आरोग्यवर्धिनी केंद्रांना 'आयुष्मान आरोग्य मंदिर' असेही म्हटले जात आहे. तालुका, उपजिल्हा आणि जिल्हा रुग्णालयांतील पायाभूत सेवांमध्ये फारसा बदल नाही, मात्र इन्फ्रास्ट्रक्चर पातळीवर जास्त बदल 'आभा' अंतर्गत केला गेला. आरोग्य संस्था बांधकामाच्या नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार विस्तारित स्वरूपात बांधकाम, बेडसंख्या वाढली, प्रयोगशाळा आणि इतर मोठ्या तपासण्यांसाठी स्वतंत्र इमारत इत्यादी बदल घडले. जेणेकरून ग्रामीण आदिवासी भागातील HWC मार्फत संदर्भित केलेल्या रुग्णांना वेळेत सेवा-सुविधा उपलब्ध करून देता येतील. या कार्यक्रमाचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे सर्वसामान्य लोकांसाठी 'प्रधानमंत्री जन आरोग्य योजना'. सामाजिक-आर्थिक जात जनगणनेच्या २०११ (SECC २०११) नुसार, वंचित आणि व्यावसायिक निकषांवर आधारित झालेले सर्वेक्षण. एकूण भारतीय लोकसंख्येतील अंदाजे ५५ कोटी लोकांसाठी प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) ही योजना २३ सप्टेंबर २०१८ पासून सुरू करण्यात आली. त्यात १२ कोटी गरीब आणि असुरक्षित कुटुंब यांचाही समावेश आहे.

आरोग्यवर्धिनी केंद्रामार्फत, खासकरून जनतेस प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, पुनर्वसन आणि वृद्धत्व काळातील काळजी (Palliative Care) यासंबधित प्राथमिक आरोग्य सेवा-सुविधा देण्याचा पहिला टप्पा गाठला जातोय. या पहिल्याच टप्प्यात गावातील / गावासाठी असलेल्या आरोग्यसंस्थेस 'सक्षम करण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने 'जन'तेची आहे. याची जाणीव करून देण्यासाठी सर्वच आरोग्यवर्धिनीच्या ठिकाणी 'जन आरोग्य समिती'ची (JAS) बांधणी होत आहे. याची प्राथमिक जबाबदारी सर्व तालुके आणि जिल्ह्यातील आरोग्य प्रशासनाकडे दिली आहे. जेणेकरून, आरोग्यवर्धिनी केंद्रात सामाजिक आरोग्यासाठी एकत्रित कृती करणे, लोकप्रतिनिधी अथवा जनप्रतिनिधींची आरोग्य केंद्रातील सहभागिता वाढवणे, आरोग्यवर्धिनी केंद्रातील कारभारात लक्ष घालून रुग्णकेंद्रित सेवा-सुविधा बळकट करणे, सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव निर्माण करणे, स्थानिक आरोग्याच्या निधींचे विकेंद्रित नियोजनात आणि ऑडिट प्रक्रियेत प्रत्यक्ष लोकसहभाग निर्माण करून पारदर्शक कारभार ठेवणे. इत्यादींसाठी आवश्यक पावले गावातच उचलली जातील.


या पार्श्वभूमीवर दि.१५ जून,२०२३ रोजी साथी संस्थेच्या माध्यमातून व आदिम संस्कृती अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र यांच्या स्थानिक संयोजनातून **जन आरोग्य समितीच्या माध्यमातून आरोग्य वर्धिनी केंद्रामार्फत पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सेवा-सुविधा सुधारण्याच्या दृष्टीने समुदायाचा सहभाग वाढवणे** हा प्रकल्प राबविण्यास सुरुवात झाली. या प्रकल्पा अंतर्गत आंबेगाव तालुक्यातील असाणे, बोरघर, कुशिरे बुद्रुक, पाटण, शिनोली या ५ आरोग्य वर्धिनी उपकेंद्राची निवड करण्यात आली. या उपकेंद्रा मध्ये जन आरोग्य समिती स्थापन करण्यात आली व या समित्यांचे प्रशिक्षण घेऊन त्यांना सक्षम करण्यात

आले. आपले कार्य – कर्तव्ये , हक्क  आणि अधिकार समजू लागलेल्या जन आरोग्य समितीने आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय बदल करण्यास सुरुवात केली. यातूनच पुढे लोकाधारित प्रक्रिया ‘सामाजिक अंकेषण’ राबविले गेली. त्याचा हा सविस्तर अहवाल, ज्यातून नाविन्यपूर्ण घडलेल्या बाबी, असलेल्या उणीवा या सर्वांचा उहापोह करण्यात आलेला आहे.

**१) आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्र – असाणे, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९**

**आलेख क्र. ०१**


**आरोग्य वर्धिनी केंद्रातील सेवा – सुविधा**




(आलेख क्र.०१ मध्ये Series 1 – होय व Series 2 - नाही )

**आलेख क्र. ०२**

**उपकेंद्रामध्ये मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांचे अनुभव**




(आलेख क्र.०२ मध्ये Series 1 – रुग्ण क्र. १, Series 2 – रुग्ण क्र.२ , Series 3 – रुग्ण क्र – ३ , Series 4 – रुग्ण क्र. ४ , Series 5 – रुग्ण क्र. ५ असे लक्षात घ्यावे. )

आलेख क्र.०१ हा आरोग्य वर्धिनी उपकेंद्र असाणे येथील पायाभूत सेवा – सुविधांची सद्यस्थिती दर्शवित आहे. तर आलेख क्र. ०२ हा या उपकेंद्रामधून मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांच्या अनुभवाच्या आधारे मुल्यांकन दर्शवित आहे.

**आलेख क्र.०१ मधून असे दिसून येते कि**,

- स्वच्छता यामध्ये ६ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये कचऱ्याच्या व्यवस्थापनाची सुविधा उपलब्ध नाही,कचरा साठविण्यासाठी ओला व सुका असे स्वतंत्र डब्बे येथे उपलब्ध नाहीत, तसेच Bio Medical west ची विल्हेवाट लावण्याची देखील सुविधा येथे उपलब्ध नाही, परिणाम यामुळे कचऱ्याचे व्यवस्थापन होत नाही.
- पिण्याचे पाणी यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, रुग्णांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही, तसेच वॉटर फिल्टर देखील बसविलेले नाही. याचाच अर्थ स्वच्छ पाणी रुग्णांना मिळण्यास अडचणी आहेत .
- जाणीव जागृती साहित्य व पोस्टर यामध्ये ४ पैकी २ गुण हे दर्शवितात कि, औषध साठा, ओपीडी च्या वेळा, जन आरोग्य समितीचा फलक येथे लावण्यात आलेला नाही, यामुळे रुग्णांची अनेकदा गैरसोय होत आहे.
- गोळ्या व औषधी यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये गोळ्या व औषधी यांची नोंद ठेवली जात आहे, वेळोवेळी आवश्यकता भासल्यास मागणी देखील केली जाते. यामुळे रुग्णांना उच्चतम दर्जाची आरोग्य सेवा मिळण्यास मदत होत असते.
- उपकरणे यामध्ये ८ पैकी ७ गुण हे दर्शवितात कि, आवश्यक सर्व उपकरणांची उपकेंद्रामध्ये उपलब्धता आहे, मात्र गरोदर पणामध्ये बाळाच्या हृदयाचे ठोके मोजण्यासाठी अत्यावश्यक असलेले फिटल डॉपलर उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही.
- इतर सुविधा यामध्ये ६ पैकी ५ गुण हे दर्शवितात कि, दवाखान्यामध्ये रुग्णांना बसण्याची व्यवस्था आहे, दवाखान्याची इमारत चांगल्या स्थितीमध्ये आहे, स्वतंत्र वीज मीटर आहे, या सुविधा रुग्णांना सुरक्षित आणि आरामदायी वातावरण उपलब्ध करून देत आहेत. मात्र, वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध नाही.
- रेकॉर्ड नोंदणी यामध्ये १० पैकी ९ गुण हे दर्शवितात कि, रेकॉर्ड नोंदणी चांगल्याप्रकारे केली जात आहे, ज्यामुळे उपकेंद्र पातळीवरील सर्व बाबींची नोंद व्यवस्थित ठेवली जात आहे. यामध्ये फक्त सूचना व तक्रारवही येथे उपलब्ध नाही.

**आलेख क्र.०२ मधून असे दिसून येते कि**,

- उपकेंद्रामध्ये रुग्णांसाठी वेगळे शौचालय, पिण्याचे पाणी, टेलिमेडिसिन ( नेटवर्क नसल्यामुळे ) इत्यादी सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेकदा रुग्णांची गैरसोय होत आहे.
- येथील CHO, ANM रुग्णांना योग्यरीत्या वागणूक देतात व त्यांचा रुग्णांशी संवाद देखील चांगला आहे.
- जन आरोग्य समिती सक्रीय असल्यामुळे अनेक बाबींवर चर्चा होऊन त्या मार्गी लावण्याचा प्रयत्न होत आहे.

**प्रकल्पाच्या माध्यमातून जन आरोग्य समिती सक्षम होऊन काय बदल झाले** ?

प्रकल्पाच्या अंतर्गत जन आरोग्य समिती सदस्य यांचे तालुका स्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आले, यातून पुढे जन आरोग्य समित्यांची पुर्नरचना करण्यात आली. या तयार झालेल्या समितीच्या ४ बैठका होऊन पुढील निर्णय झाले,

- शौचालय युनिट बांधणे
- आयुष्यमान भवः चा कार्यक्रम व समिती सदस्य यांचे प्रशिक्षण
- MPW पद भरण्यासाठी ग्रामसभेच्या मार्फत पाठपुरावा करणे.
- पिण्याचे पाणी, संगणक व प्रिंटर , स्वतंत्र शौचालय, सिमेंट ब्लॉक बसविणे, ड्रेनेज लाईन दुरुस्त करणे .

**या हे निर्णय नाही**, **तर यावर जन आरोग्य समितीने अंमलबजावणी देखील केले आणि या अंमलबजावणी मधून** – MPW पद भरले जावे हा विषय ग्रामसभेच्या माध्यमातून ठराव करून जिल्हा परिषद कडे मांडला गेला आहे. इमारत दुरुस्तीचा विषय ग्रामसभेत चर्चिले गेला यावर पंचायत समितीकडे पाठपुरावा करण्यात आला, यावर पुढे पंचायत समितीच्या बांधकाम विभागाने ५ लाखाचे इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव तयार करून पुणे जिल्हा परिषदेकडे पाठविला आहे. यातून उपकेंद्र इमारतीची चांगल्याप्रकारे दुरुस्ती होऊन, अनेक मुद्दे सुटले जातील. यासोबतच गाव पातळीवर NCD चे स्क्रीनिंग शिबीर घेण्यात आले. ॲनेमिया तपासणी शिबीर घेण्यात आले, या माध्यमातून ४५ कुटुंबांना परसबाग बियाणे वाटप करण्यात आले. शासकीय आश्रमशाळेतील मुलांची डोळ्यांच्या साथी विषयी तपासणी करण्यात आली, आढळून आलेल्या १० मुलांवर उपचार सुरु करण्यात आले होते.

**या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे**,

- कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी स्वतंत्र दोन डब्बे, तसेच तसेच Bio Medical west ची विल्हेवाट लावण्याची देखील सुविधा येथे तात्काळ उपलब्ध करणे गरजेचे आहे .
- पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणे ही एक गंभीर समस्या आहे ज्याकडे त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे कर्मचारी आणि रुग्ण या दोघांच्याही कल्याणासाठी आवश्यक आहे आणि ही कमतरता तातडीने दूर करण्यासाठी प्रयत्नांना प्राधान्य दिले पाहिजे.
- जागरूकता साहित्य आणि पोस्चरिंगसाठी कमी गुण उपकेंद्रामध्ये सुधारित संप्रेषण धोरणांची आवश्यकता हायलाइट करते. शैक्षणिक साहित्याची उपलब्धता वाढवणे आणि जागरूकता मोहिमा राबवणे, रुग्णांना अत्यावश्यक आरोग्य माहितीसह सक्षम करण्यात मदत करू शकते आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा पद्धतींना प्रोत्साहन देऊ शकते.
- उपकरणांचे गुण तुलनेने उच्च असताना, दर्जेदार आरोग्य सेवांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी वैद्यकीय उपकरणांची देखभाल आणि अद्ययावत करण्यात सतत गुंतवणूक महत्त्वाची आहे. गरोदर पणामध्ये बाळाच्या हृदयाचे ठोके मोजण्यासाठी अत्यावश्यक असलेले फिटल डॉपलर देखील उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही, ते तात्काळ उपलब्ध करणे गरजेचे आहे.
- रुग्णांसाठी स्वतंत्र शौचालय बांधकाम करणे अत्यंत गरजेचे आहे, कारण येथे रुग्णांसाठी स्वतंत्र शौचालय उपलब्ध नाही. त्यामुळे उपचारासाठी आलेल्या रुग्णांची आणि विशेष करून महिलांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे.
- जन आरोग्य समितीचा फलक लावणे आवश्यक आहे. ज्यामुळे जन आरोग्य समितीचे महत्व व तिच्या सदस्यांच्या विषयी माहिती नागरिकांमध्ये होईल, यातून हि जन आरोग्य समिती उत्तरदायी बनण्यास मदत होईल.
- येथील बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW) हे पद देखील भरणे महत्वाचे आहे.
- वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध करणे आवश्यक आहे. जेणेकरून अपंग किंवा वृद्ध रुग्णांची गैरसोय होणारं नाही.

- यासोबत सूचना व तक्रारवही येथे उपलब्ध नाही. ती उपलब्ध करून देणे व त्याविषयी नागरिकांमध्ये जाणीवजागृती करणे आवश्यक आहे, यामधून आलेल्या सूचना किंवा तक्रारी याची जन आरोग्य समितीच्या बैठकीत चर्चा करणे गरजेचे आहे.

एकूणच, आरोग्य वर्धिनी केंद्राच्या सेवा आणि सुविधांच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्याच्या संधी आहेत. ओळखल्या गेलेल्या कमतरतांचे निराकरण करणे आणि सद्यस्थितीचा अधिक विकास केल्याने केंद्रातील आरोग्य सेवा वितरणाची एकूण गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढण्यास हातभार लागेल.


**आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्राचे जन आरोग्य समिती मार्फत तयार झालेले सेवा-सुविधांचे प्रगती पत्रक (रिपोर्ट कार्ड)**

**आरोग्य वर्धिनी उपकेंद्राचे नाव - असाणे, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९, दिनांक - एप्रिल, २०२४**

| **अ.क्र.** | **सोयी – सुविधा** | **सद्यःस्थिती** | | |
|---|---|---|---|---|
| | | चांगली | साधारण | वाईट |
| १. | स्वच्छता | | | |
| २. | पिण्याचे पाणी | | | |
| ३. | जाणीव-जागृती साहित्य व पोष्टर | | | |
| ४. | गोळ्या व औषधी (आवश्यक औषधांची यादी आ.कें.कडून) | | | |
| ५. | उपकरणे | | | |
| ६. | आरोग्य वर्धिनीकेंद्रातील इतर पण महत्त्वाच्या सुविधा | | | |
| ७. | रेकॉर्ड / दस्तऐवजीकरण | | | |
| ८. | इतर आजारांवर प्रतिबंधक उपाय-उपचार व त्याविषयी माहितीचे साधने याबद्दल एकूण मत | | | |
| ९. | प्रत्यक्ष रुग्णांना मिळालेल्या सेवा-सुविधांच्या अनुभवातून मिळालेले एकूण गुण<br>• ६३ ते ८५ गुण मिळाल्यास चांगली परिस्थिती<br>• ४३ ते ६२ गुण मिळाल्यास साधारण परिस्थिती<br>• ४२ किंवा त्यापेक्षा कमी गुण मिळाल्यास वाईट परिस्थिती | | | |


## २) आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्र – बोरघर, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९

**आलेख क्र. ०३**
**आरोग्य वर्धिनी केंद्रातील सेवा – सुविधा**




(आलेख क्र.०३ मध्ये Series 1 – होय व Series 2 - नाही )

**आलेख क्र. ०४**
**उपकेंद्रामध्ये मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांचे अनुभव**




(आलेख क्र.०४ मध्ये Series 1 – रुग्ण क्र. १, Series 2 – रुग्ण क्र.२ , Series 3 – रुग्ण क्र – ३ , Series 4 – रुग्ण क्र. ४ , Series 5 – रुग्ण क्र. ५ असे लक्षात घ्यावे. )

आलेख क्र.०३ हा आरोग्य वर्धिनी उपकेंद्र बोरघर येथील पायाभूत सेवा – सुविधांची सद्यस्थिती दर्शवित आहे. तर आलेख क्र. ०४ हा या उपकेंद्रामधून मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांच्या अनुभवाच्या आधारे मुल्यांकन दर्शवित आहे.

**आलेख क्र.०३ मधून असे दिसून येते कि,**

- स्वच्छता यामध्ये ६ पैकी ६ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये कचऱ्याच्या व्यवस्थापनाची सुविधा उपलब्ध आहे. कचरा साठविण्यासाठी ओला व सुका असे स्वतंत्र डब्बे येथे उपलब्ध आहेत, तसेच Bio Medical west ची विल्हेवाट लावण्याची देखील सुविधा येथे उपलब्ध आहे, परिणाम यामुळे कचऱ्याचे योग्यरीत्या व्यवस्थापन केले जात आहे. ज्यामुळे परिसराची स्वच्छता राखली जात आहे.
- पिण्याचे पाणी यामध्ये ४ पैकी २ गुण हे दर्शवितात कि, रुग्णांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे , मात्र वॉटर फिल्टर बसविलेले नाही. याचाच अर्थ स्वच्छ पाणी रुग्णांना मिळण्यास अडचणी आहेत.
- जाणीव जागृती साहित्य व पोस्टर यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, औषध साठा, ओपीडी च्या वेळा, जन आरोग्य समितीचा फलक येथे लावण्यात आलेले आहेत, यामुळे रुग्णांची अनेकदा गैरसोय होत नाही. रुग्णांना वेगवेगळ्या प्रकारची योग्य माहिती उपकेंद्रामध्ये आल्यावर मिळत असते. यामधून हे देखील दिसून येते कि नागरिकांमध्ये आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी शैक्षणिक साहित्य आणि संवाद धोरणांचा प्रभावीपणे येथे वापर करण्यात येत आहे.
- गोळ्या व औषधी यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये गोळ्या व औषधी यांची नोंद ठेवली जात आहे, वेळोवेळी आवश्यकता भासल्यास मागणी देखील केली जाते. यामुळे रुग्णांना उच्चतम दर्जाची आरोग्य सेवा मिळण्यास मदत होत असते.
- उपकरणे यामध्ये ८ पैकी ७ गुण हे दर्शवितात कि, आवश्यक सर्व उपकरणांची उपकेंद्रामध्ये उपलब्धता आहे, मात्र गरोदर पणामध्ये बाळाच्या हृदयाचे ठोके मोजण्यासाठी अत्यावश्यक असलेले फिटल डॉपलर उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही.
- इतर सुविधा यामध्ये ६ पैकी ५ गुण हे दर्शवितात कि, दवाखान्यामध्ये रुग्णांना बसण्याची व्यवस्था आहे, दवाखान्याची इमारत चांगल्या स्थितीमध्ये आहे, स्वतंत्र वीज मीटर आहे, या सुविधा रुग्णांना सुरक्षित आणि आरामदायी वातावरण उपलब्ध करून देत आहेत. मात्र, वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध नाही.
- रेकॉर्ड नोंदणी यामध्ये १० पैकी ७ गुण हे दर्शवितात कि, रेकॉर्ड नोंदणी चांगल्याप्रकारे केली जात आहे, ज्यामुळे उपकेंद्र पातळीवरील सर्व बाबींची नोंद व्यवस्थित ठेवली जात आहे. यामध्ये फक्त योगासने व आरोग्य शिबिरे झाल्याची महत्वाची नोंद केलेली नाही. यासोबत सूचना व तक्रारवही येथे उपलब्ध नाही.

**आलेख क्र.०४ मधून असे दिसून येते कि,**

- उपकेंद्रामध्ये रुग्णांसाठी पिण्याचे पाण्याचे वॉटर फिल्टर , टेलीमेडिसिन ( CHO ) नसल्यामुळे इत्यादी सुविधा उपलब्ध नाहीत .यासोबतच समुदाय आरोग्य अधिकारी देखील येथे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेकदा रुग्णांची गैरसोय होत आहे. असे असले तरी इतर सुविधांबाबत उपकेंद्राविषयी व उपकेंद्रातील कर्मचारी यांच्याविषयी रुग्णांची मते चांगली आहेत.
- येथे समुदाय आरोग्य अधिकारी हे पद रिक्त असताना देखील उपलब्ध कर्मचारी यामध्ये ANM व MPW चांगल्याप्रकारे सेवा देत आहेत, असे रुग्णांचे अनुभव आहेत.

- जन आरोग्य समितीच्या माध्यमातून गावात आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात.

**प्रकल्पाच्या माध्यमातून जन आरोग्य समिती सक्षम होऊन काय बदल झाले** ?

प्रकल्पाच्या अंतर्गत जन आरोग्य समिती सदस्य यांचे तालुका स्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आले, यातून पुढे जन आरोग्य समित्यांची पुर्नरचना करण्यात आली. या तयार झालेल्या समितीच्या ५ बैठका होऊन पुढील निर्णय झाले,

- गोळ्या औषधे पुरविण्यासाठी ग्रामपंचायतीस पत्र देणे .
- सोयीसुविधा पुरविणे साठी ग्रामपंचायत कडे पाठपुरावा करणे.
- लहान मुलांना वाफ देण्यासाठी मशीन, BP ऑपरेटर व HB कीट पुरविण्यासाठी ग्रामपंचायत कडे पाठपुरावा करण्यात आला.
- NCD तपासणी शिबीर आयोजित केले गेले.

**या हे निर्णय नाही, तर यावर जन आरोग्य समितीने अंमलबजावणी देखील केले आणि या अंमलबजावणी मधून** – ग्रामपंचायतीने आत्तापर्यंत १ संगणक,१ प्रिंटर, १ टेबल, १ कपाट , १ वाफेची मशीन इत्यादी उपकेंद्रास पुरविले आहे. उपकेंद्र आणि स्थानिक संस्थांच्या मदतीने जन आरोग्य समितीने १ NCD स्क्रीनिंग शिबिर उपकेंद्र पातळीवर आयोजित केले, ज्यामध्ये ९४ व्यक्तींची स्क्रीनिंग करण्यात आली होती. जन आरोग्य समितीच्या बैठका नियमित होत आहेत, CHO नसल्यामुळे पर्यायी CHO देण्याची मागणी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे करण्यात आलेली होती. सद्यस्थिती मध्ये समुदाय आरोग्य अधिकारी येथे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्यात आले आहेत.

**या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे**,

- पिण्याच्या पाण्याचे  वॉटर फिल्टर सुविधा नसणे ही एक गंभीर समस्या आहे ज्याकडे त्वरित लक्ष देण्याची गरज आहे स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे कर्मचारी .आणि रुग्ण या दोघांच्याही कल्याणासाठी आवश्यक आहे आणि ही कमतरता तातडीने दूर करण्यासाठी प्रयत्नांना प्राधान्य दिले पाहिजे.
- उपकरणांचे गुण तुलनेने उच्च असताना, दर्जेदार आरोग्य सेवांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी वैद्यकीय उपकरणांची देखभाल आणि अद्ययावत करण्यात सतत गुंतवणूक महत्त्वाची आहे. गरोदर पणामध्ये बाळाच्या हृदयाचे ठोके मोजण्यासाठी अत्यावश्यक असलेले फिटल डॉपलर देखील उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही, ते तात्काळ उपलब्ध करणे गरजेचे आहे.
- येथील समुदाय आरोग्य अधिकारी (CHO ) हे पद देखील भरणे महत्वाचे आहे. यामुळे विशेष करून NCD रुग्णांना याच ठिकाणी योग्य उपचार मिळण्यास मदत होईल.

एकूणच, आरोग्य वर्धिनी केंद्राच्या सेवा आणि सुविधांच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्याच्या संधी आहेत. ओळखल्या गेलेल्या कमतरतांचे निराकरण करणे आणि सद्यस्थितीचा अधिक विकास केल्याने केंद्रातील आरोग्य सेवा वितरणाची एकूण गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढण्यास हातभार लागेल.


**आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्राचे जन आरोग्य समिती मार्फत तयार झालेले सेवा-सुविधांचे प्रगती पत्रक (रिपोर्ट कार्ड)**

**आरोग्य वर्धिनी उपकेंद्राचे नाव - बोरघर, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९ , दिनांक - एप्रिल, २०२४**

| अ.क्र. | सोयी – सुविधा | सद्यःस्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | चांगली | साधारण | वाईट |
| ६. | स्वच्छता | | | |
| ७. | पिण्याचे पाणी | | | |
| ८. | जाणीव-जागृती साहित्य व पोष्टर | | | |
| ९. | गोळ्या व औषधी (आवश्यक औषधांची यादी आ.कें.कडून) | | | |
| १०. | उपकरणे | | | |
| ६. | आरोग्य वर्धिनीकेंद्रातील इतर पण महत्त्वाच्या सुविधा | | | |
| ७. | रेकॉर्ड / दस्तऐवजीकरण | | | |
| ८. | इतर आजारांवर प्रतिबंधक उपाय-उपचार व त्याविषयी माहितीचे साधने याबद्दल एकूण मत | | | |
| ९. | प्रत्यक्ष रुग्णांना मिळालेल्या सेवा-सुविधांच्या अनुभवातून मिळालेले एकूण गुण<br>• ६३ ते ८५ गुण मिळाल्यास चांगली परिस्थिती<br>• ४३ ते ६२ गुण मिळाल्यास साधारण परिस्थिती<br>• ४२ किंवा त्यापेक्षा कमी गुण मिळाल्यास वाईट परिस्थिती | | | |


### ३) आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्र – कुशिरे बुद्रुक , ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९

**आलेख क्र. ०५**
**आरोग्य वर्धिनी केंद्रातील सेवा – सुविधा**




(आलेख क्र.०५ मध्ये Series 1 – होय व Series 2 - नाही )

**आलेख क्र. ०६**
**उपकेंद्रामध्ये मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांचे अनुभव**




(आलेख क्र.०६ मध्ये Series 1 – रुग्ण क्र. १, Series 2 – रुग्ण क्र.२ , Series 3 – रुग्ण क्र – ३ , Series 4 – रुग्ण क्र. ४ , Series 5 – रुग्ण क्र. ५ असे लक्षात घ्यावे. )

आलेख क्र.०५ हा आरोग्य वर्धिनी उपकेंद्र बोरघर येथील पायाभूत सेवा – सुविधांची सद्यस्थिती दर्शवित आहे. तर आलेख क्र. ०६ हा या उपकेंद्रामधून मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांच्या अनुभवाच्या आधारे मुल्यांकन दर्शवित आहे.

**आलेख क्र.०५ मधून असे दिसून येते कि,**

- स्वच्छता यामध्ये ६ पैकी ३ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये कचऱ्याच्या व्यवस्थापनाची सुविधा उपलब्ध आहे. कचरा साठविण्यासाठी ओला व सुका असे स्वतंत्र डब्बे येथे उपलब्ध आहेत, तसेच Bio Medical west ची विल्हेवाट लावण्याची देखील सुविधा येथे उपलब्ध आहे, मात्र वापरण्यासाठी पाणी उपलब्ध नाही, त्यासोबतच शौचालय आहे, मात्र ते चालू स्थितीमध्ये नाही. त्यामुळे कर्मचारी व रुग्ण या दोघांचीही मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.
- पिण्याचे पाणी यामध्ये ४ पैकी १ गुण हे दर्शवितात कि, रुग्णांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही, वॉटर फिल्टर बसविलेले नाही. याचाच अर्थ स्वच्छ पाणी रुग्णांना मिळण्यास अडचणी आहेत. तात्पुरत्या स्वरुपात आशा वर्कर या बाहेरून पाणी घेऊन येतात.
- जाणीव जागृती साहित्य व पोस्टर यामध्ये ४ पैकी ३ गुण हे दर्शवितात कि, औषध साठा, ओपीडी च्या वेळा इत्यादी येथे लावण्यात आलेले आहे, यामुळे रुग्णांची अनेकदा गैरसोय होत नाही. रुग्णांना वेगवेगळ्या प्रकारची योग्य माहिती उपकेंद्रामध्ये आल्यावर मिळत असते. यामधून हे देखील दिसून येते कि नागरिकांमध्ये आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी शैक्षणिक साहित्य आणि संवाद धोरणांचा प्रभावीपणे येथे वापर करण्यात येत आहे. मात्र जन आरोग्य समितीचा फलक येथे लावण्यात आलेला नाही,
- गोळ्या व औषधी यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये गोळ्या व औषधी यांची नोंद ठेवली जात आहे, वेळोवेळी आवश्यकता भासल्यास मागणी देखील केली जाते. यामुळे रुग्णांना उच्चतम दर्जाची आरोग्य सेवा मिळण्यास मदत होत असते.
- उपकरणे यामध्ये ८ पैकी ७ गुण हे दर्शवितात कि, आवश्यक सर्व उपकरणांची उपकेंद्रामध्ये उपलब्धता आहे, मात्र थर्मामीटर उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही.
- इतर सुविधा यामध्ये ६ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, दवाखान्यामध्ये रुग्णांना बसण्याची व्यवस्था आहे, स्वतंत्र वीज मीटर आहे. दवाखान्याचा इमारतीस संरक्षक भिंत आहे, मात्र गेट बसविला गेलेला नाही. दवाखान्याची इमारत चांगल्या स्थितीमध्ये नाही. यासोबतच वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध नाही.
- रेकॉर्ड नोंदणी यामध्ये १० पैकी ८ गुण हे दर्शवितात कि, रेकॉर्ड नोंदणी चांगल्याप्रकारे केली जात आहे, ज्यामुळे उपकेंद्र पातळीवरील सर्व बाबींची नोंद व्यवस्थित ठेवली जात आहे. यामध्ये फक्त योगासने व आरोग्य शिबिरे झाल्याची महत्वाची नोंद केलेली नाही. यासोबत सूचना व तक्रारवही येथे उपलब्ध नाही.

**आलेख क्र.०६ मधून असे दिसून येते कि,**

- उपकेंद्रामध्ये रुग्णांसाठी पिण्याचे पाण्याचे वॉटर फिल्टर, टेलीमेडिसिन(नेटवर्क नसल्यामुळे) इत्यादी सुविधा अनेकदा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे अनेकदा रुग्णांची गैरसोय होत आहे. असे असले तरी इतर सुविधांबाबत उप्केंद्राविषयी व उपकेंद्रातील कर्मचारी यांच्याविषयी रुग्णांची मते चांगली आहेत.
- येथे सर्व पदे भरलेली आहेत व हे सर्व कर्मचारी चांगल्याप्रकारे सेवा देत आहेत, असे रुग्णांचे अनुभव आहेत.
- उपकेंद्र मध्यवर्ती ठिकाणी नसल्यामुळे अनेकांना येथे येणे शक्य होत नाही, अशा वेळी जन आरोग्य समितीच्या माध्यमातून गावात आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. समुदाय आरोग्य अधिकारी आणि त्यांची टीम हि गावोगाव जाऊन आरोग्य सेवा देत आहेत.

**प्रकल्पाच्या माध्यमातून जन आरोग्य समिती सक्षम होऊन काय बदल झाले** ?

प्रकल्पाच्या अंतर्गत जन आरोग्य समिती सदस्य यांचे तालुका स्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आले, यातून पुढे जन आरोग्य समित्यांची पुर्नरचना करण्यात आली. या तयार झालेल्या समितीच्या ७ बैठका होऊन पुढील निर्णय झाले,

- मीटर घेणे
- विद्युत जोडणी साहित्य खरेदी करणे
- गोळ्या खरेदी करणे
- टाइल्स बसविणे, नळ कनेक्शन, उपकेंद्र नाव बदलणे, समिती पुनर्रचना, अर्धवेळ कर्मचारी नेमणे

**या हे निर्णय नाही**, **तर यावर जन आरोग्य समितीने अंमलबजावणी देखील केले आणि या अंमलबजावणी मधून** – कोटेशन भरून मीटर घेण्यात आला आहे, व विद्युत जोडणी करण्यासाठी साहित्य खरेदी केले गेले आहे. डिसेंबर व जानेवारी मध्ये गोळ्या खरेदी केल्या गेल्या. (उपकेंद्र निधी मधून ), उपकेंद्र नाव बदलले ( पेटिंग करून घेतली आहे ), समितीची पुनर्रचना करून अध्यक्ष व इतर सदस्य बदलून नवीन समाविष्ट केले आहेत. अर्धवेळ कर्मचारी प्रश्न मार्गी लागला असून , ग्रामसभेत ठराव होऊन विषय तालुका पातळीवर गेला आहे. नळ कनेक्शन प्रश्न मार्गी लागत आहे, पाण्याची पाईप लाईन जोडणी चालू आहे. हे सर्व बदल जन आरोग्य समिती व येथील सरपंच यांच्याशी समन्वय साधुन झालेले आहेत.

**या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे**,

- पिण्याच्या पाण्याचे वॉटर फिल्टर सुविधा नसणे, वापरण्यासाठी पाणी नसणे ही एक गंभीर समस्या आहे ज्याकडे त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे कर्मचारी आणि रुग्ण या दोघांच्याही कल्याणासाठी आवश्यक आहे आणि ही कमतरता तातडीने दूर करण्यासाठी प्रयत्नांना प्राधान्य दिले पाहिजे.
- उपकरणांचे गुण तुलनेने उच्च असताना, दर्जेदार आरोग्य सेवांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी वैद्यकीय उपकरणांची देखभाल आणि अद्ययावत करण्यात सतत गुंतवणूक महत्त्वाची आहे. थर्मामीटर उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही, ते तात्काळ उपलब्ध करणे गरजेचे आहे.
- उपकेंद्र इमारतीची दुरुस्ती, यामध्ये पाण्याची टाकी बसविणे, वीज जोडणी, शौचालय दुरुस्त करून वापरण्यायोग्य करणे आवश्यक आहे. गेट बसविणे आवश्यक आहे.
- यासोबतच वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध नाही, ते उपलब्ध करणे आवश्यक आहे.

एकूणच, आरोग्य वर्धिनी केंद्राच्या सेवा आणि सुविधांच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्याच्या संधी आहेत. ओळखल्या गेलेल्या कमतरतांचे निराकरण करणे आणि सद्यस्थितीचा अधिक विकास केल्याने केंद्रातील आरोग्य सेवा वितरणाची एकूण गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढण्यास हातभार लागेल.


**आयुष्मान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्राचे जन आरोग्य समिती मार्फत तयार झालेले सेवा-सुविधांचे प्रगती पत्रक (रिपोर्ट कार्ड)**

**आरोग्य वर्धिनी उपकेंद्राचे नाव - कुशिरे बुद्रुक, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९**
**दिनांक - एप्रिल, २०२४**


| **अ.क्र.** | **सोयी – सुविधा** | **सद्यःस्थिती** | | |
|---|---|---|---|---|
| | | चांगली | साधारण | वाईट |
| ११. | स्वच्छता | | | |
| १२. | पिण्याचे पाणी | | | |
| १३. | जाणीव-जागृती साहित्य व पोष्टर | | | |
| १४. | गोळ्या व औषधी (आवश्यक औषधांची यादी आ.कें.कडून) | | | |
| १५. | उपकरणे | | | |
| ६. | आरोग्य वर्धिनीकेंद्रातील इतर पण महत्त्वाच्या सुविधा | | | |
| ७. | रेकॉर्ड / दस्तऐवजीकरण | | | |
| ८. | इतर आजारांवर प्रतिबंधक उपाय-उपचार व त्याविषयी माहितीचे साधने याबद्दल एकूण मत | | | |
| ९. | प्रत्यक्ष रुग्णांना मिळालेल्या सेवा-सुविधांच्या अनुभवातून मिळालेले एकूण गुण<br>• ६३ ते ८५ गुण मिळाल्यास चांगली परिस्थिती<br>• ४३ ते ६२ गुण मिळाल्यास साधारण परिस्थिती<br>• ४२ किंवा त्यापेक्षा कमी गुण मिळाल्यास वाईट परिस्थिती | | | |

### ४) आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्र – पाटण, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९

**आलेख क्र. ०७**
**आरोग्य वर्धिनी केंद्रातील सेवा – सुविधा**




(आलेख क्र.०७ मध्ये Series 1 – होय व Series 2 - नाही )




(आलेख क्र.०८ मध्ये Series 1 – रुग्ण क्र. १, Series 2 – रुग्ण क्र.२ , Series 3 – रुग्ण क्र – ३ , Series 4 – रुग्ण क्र. ४ , Series 5 – रुग्ण क्र. ५ असे लक्षात घ्यावे. )

आलेख क्र.०७ हा आरोग्य वर्धिनी उपकेंद्र बोरघर येथील पायाभूत सेवा – सुविधांची सद्यस्थिती दर्शवित आहे. तर आलेख क्र. ०८ हा या उपकेंद्रामधून मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांच्या अनुभवाच्या आधारे मुल्यांकन दर्शवित आहे.

**आलेख क्र.०७ मधून असे दिसून येते कि,**

- स्वच्छता यामध्ये ६ पैकी ० गुण हे दर्शवितात
- पिण्याचे पाणी यामध्ये ४ पैकी ० गुण हे दर्शवितात
- जाणीव जागृती साहित्य व पोस्टर यामध्ये ४ पैकी ० गुण हे दर्शवितात
- गोळ्या व औषधी यामध्ये ४ पैकी ० गुण दर्शवितात (याचे कारण उपकेंद्र इमारतीचे काम चालू असल्यामुळे वरील कोणत्याच बाबी आत्ता सद्यस्थितीत उपलब्ध नाहीत, कारण इमारतच नाही. म्हणून या सर्वांची गुण हे ० येत आहेत.)
- उपकरणे यामध्ये ८ पैकी ५ गुण हे दर्शवितात कि, आवश्यक सर्व उपकरणांची उपकेंद्रामध्ये उपलब्धता आहे, मात्र थर्मामीटर,उंची मापक, स्टरीलायझर उपलब्ध नाही. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असते.
- इतर सुविधा यामध्ये ६ पैकी ० गुण हे दर्शवितात (याचे कारण उपकेंद्र इमारतीचे काम चालू असल्यामुळे वरील कोणत्याच बाबी आत्ता सद्यस्थितीत उपलब्ध नाहीत, कारण इमारतच नाही. म्हणून या सर्वांची गुण हे ० येत आहेत.)
- रेकॉर्ड नोंदणी यामध्ये १० पैकी ८ गुण हे दर्शवितात कि, रेकॉर्ड नोंदणी चांगल्याप्रकारे केली जात आहे, ज्यामुळे उपकेंद्र इमारत जरी नसली तरी प्राथमिक आरोग्य केंद्र तळेघर येथे बसून सर्व बाबींची नोंद व्यवस्थित ठेवली जात आहे. यामध्ये फक्त सूचना व तक्रारवही येथे उपलब्ध नाही. तर आवश्यक असलेल्या बाबी या जन आरोग्य समितीच्या बैठकीत निर्णय घेऊन खरेदी केल्या जात नाहीत. हि गंभीर बाब आहे.

**आलेख क्र.०८ मधून असे दिसून येते कि,**

- उपकेंद्र इमारत जरी नसली तरी असे दिसते कि, CHO, ANM, MPW हे गावोगाव जाऊन आरोग्यसेवा देत आहेत. असे असले तरी उपकेंद्रातील कर्मचारी यांच्याविषयी रुग्णांची मते चांगली आहेत.
- येथे सर्व पदे भरलेली आहेत व हे सर्व कर्मचारी चांगल्याप्रकारे सेवा देत आहेत, असे रुग्णांचे अनुभव आहेत.
- उपकेंद्र इमारत नसल्यामुळे अनेकांना उपचार करणे शक्य होत नाही, अशा वेळी जन आरोग्य समितीच्या माध्यमातून गावात आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. समुदाय आरोग्य अधिकारी आणि त्यांची टीम हि गावोगाव जाऊन आरोग्य सेवा देत आहेत.

**प्रकल्पाच्या माध्यमातून जन आरोग्य समिती सक्षम होऊन काय बदल झाले ?**

प्रकल्पाच्या अंतर्गत जन आरोग्य समिती सदस्य यांचे तालुका स्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आले, यातून पुढे जन आरोग्य समित्यांची पुर्नरचना करण्यात आली. या तयार झालेल्या समितीच्या २ बैठका होऊन पुढील निर्णय झाले,

- जन आरोग्य समितीची पुर्नरचना करणे.
- लसीकरण व समुपदेशन सत्र आयोजित करणे
- उपकेंद्र इमारत काम पुर्ण करून घेण्यास पाठपुरावा करणे.

**या हे निर्णय नाही, तर यावर जन आरोग्य समितीने अंमलबजावणी देखील केले आणि या अंमलबजावणी मधून** – NCD रुग्ण व गरोदर आणि स्तनदा माता यांचासाठी पिंपरी व पाटण येथे समुपदेशन सत्र घेण्यात आली. उपकेंद्र इमारत पुर्ण झालेली आहे, मात्र किरकोळ कामे राहिली आहेत. याचा देखील पाठपुरावा चालू आहे. जन आरोग्य समितीची पुर्नरचना करण्यात येत आहे.

**या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे,**

- इमारतीचे बांधकाम पुर्ण झालेले आहे, त्यामुळे लवकरात लवकर हि इमारत वापरण्यासाठी उपलब्ध करून देणे हे कर्मचारी आणि रुग्ण या दोघांच्याही कल्याणासाठी आवश्यक आहे आणि ही कमतरता तातडीने दूर करण्यासाठी प्रयत्नांना प्राधान्य दिले पाहिजे.
- उपकरणांचे गुण तुलनेने उच्च असताना, दर्जेदार आरोग्य सेवांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी वैद्यकीय उपकरणांची देखभाल आणि अद्ययावत करण्यात सतत गुंतवणूक महत्त्वाची आहे. उंचीमापक उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही, ते तात्काळ उपलब्ध करणे गरजेचे आहे.

एकूणच, आरोग्य वर्धिनी केंद्राच्या सेवा आणि सुविधांच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्याच्या संधी आहेत. ओळखल्या गेलेल्या कमतरतांचे निराकरण करणे आणि सद्यस्थितीचा अधिक विकास केल्याने केंद्रातील आरोग्य सेवा वितरणाची एकूण गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढण्यास हातभार लागेल.


**आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्राचे जन आरोग्य समिती मार्फत तयार झालेले सेवा-सुविधांचे प्रगती पत्रक (रिपोर्ट कार्ड)**

**आरोग्य वर्धिनी उपकेंद्राचे नाव - पाटण, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५०९ , दिनांक - एप्रिल, २०२४**

| अ.क्र. | सोयी – सुविधा | सद्यःस्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | चांगली | साधारण | वाईट |
| १६. | स्वच्छता | | | |
| १७. | पिण्याचे पाणी | | | |
| १८. | जाणीव-जागृती साहित्य व पोष्टर | | | |
| १९. | गोळ्या व औषधी (आवश्यक औषधांची यादी आ.कें.कडून) | | | |
| २०. | उपकरणे | | | |
| ६. | आरोग्य वर्धिनीकेंद्रातील इतर पण महत्त्वाच्या सुविधा | | | |
| ७. | रेकॉर्ड / दस्तऐवजीकरण | | | |
| ८. | इतर आजारांवर प्रतिबंधक उपाय-उपचार व त्याविषयी माहितीचे साधने याबद्दल एकूण मत | | | |
| ९. | प्रत्यक्ष रुग्णांना मिळालेल्या सेवा-सुविधांच्या अनुभवातून मिळालेले एकूण गुण<br>• ६३ ते ८५ गुण मिळाल्यास चांगली परिस्थिती<br>• ४३ ते ६२ गुण मिळाल्यास साधारण परिस्थिती<br>• ४२ किंवा त्यापेक्षा कमी गुण मिळाल्यास वाईट परिस्थिती | | | |


## ६) आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्र – शिनोली, ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५१६

**आलेख क्र. ०९**
**आरोग्य वर्धिनी केंद्रातील सेवा – सुविधा**




(आलेख क्र.०९ मध्ये Series 1 – होय व Series 2 - नाही )

**आलेख क्र. १०**
**उपकेंद्रामध्ये मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांचे अनुभव**




(आलेख क्र.१० मध्ये Series 1 – रुग्ण क्र. १, Series 2 – रुग्ण क्र.२ , Series 3 –रुग्ण क्र – ३ , Series 4 – रुग्ण क्र. ४ , Series 5 – रुग्ण क्र. ५ असे लक्षात घ्यावे. )

आलेख क्र.०९ हा आरोग्य वर्धिनी उपकेंद्र बोरघर येथील पायाभूत सेवा – सुविधांची सद्यस्थिती दर्शवित आहे. तर आलेख क्र. १० हा या उपकेंद्रामधून मिळालेल्या सेवांबद्दल रुग्णांच्या अनुभवाच्या आधारे मुल्यांकन दर्शवित आहे.

**आलेख क्र.०९ मधून असे दिसून येते कि**,

- स्वच्छता यामध्ये ६ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये कचऱ्याच्या व्यवस्थापनाची सुविधा उपलब्ध आहे. कचरा साठविण्यासाठी ओला व सुका असे स्वतंत्र डब्बे येथे उपलब्ध आहेत, तसेच Bio Medical west ची विल्हेवाट लावण्याची देखील सुविधा येथे उपलब्ध आहे, पेशंट कॉट वरील बेडशीट स्वच्छ नाहीत.
- पिण्याचे पाणी यामध्ये ४ पैकी ३ गुण हे दर्शवितात कि, रुग्णांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे, मात्र वॉटर फिल्टर बसविलेले नाही. याचाच अर्थ स्वच्छ पाणी रुग्णांना मिळण्यास अडचणी आहेत.
- जाणीव जागृती साहित्य व पोस्टर यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, औषध साठा, ओपीडी च्या वेळा इत्यादी येथे लावण्यात आलेले आहे, यामुळे रुग्णांची अनेकदा गैरसोय होत नाही. रुग्णांना वेगवेगळ्या प्रकारची योग्य माहिती उपकेंद्रामध्ये आल्यावर मिळत असते. यामधून हे देखील दिसून येते कि नागरिकांमध्ये आरोग्य समस्यांबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी शैक्षणिक साहित्य आणि संवाद धोरणांचा प्रभावीपणे येथे वापर करण्यात येत आहे. जन आरोग्य समितीचा फलक देखील येथे लावण्यात आलेला आहे.
- गोळ्या व औषधी यामध्ये ४ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, उपकेंद्रामध्ये गोळ्या व औषधी यांची नोंद ठेवली जात आहे, वेळोवेळी आवश्यकता भासल्यास मागणी देखील केली जाते. यामुळे रुग्णांना उच्चतम दर्जाची आरोग्य सेवा मिळण्यास मदत होत असते.
- उपकरणे यामध्ये ८ पैकी ७ गुण हे दर्शवितात कि, आवश्यक सर्व उपकरणांची उपकेंद्रामध्ये उपलब्धता आहे, मात्र मोठ्या माणसांसाठी वजन काटा येथे उपलब्ध नाही, लहान मुलांसाठीचा आहे.
- इतर सुविधा यामध्ये ६ पैकी ४ गुण हे दर्शवितात कि, दवाखान्यामध्ये रुग्णांना बसण्याची व्यवस्था आहे, स्वतंत्र वीज मीटर आहे. दवाखान्याचा इमारतीस संरक्षक भिंत नाही, यासोबतच वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध नाही.
- रेकॉर्ड नोंदणी यामध्ये १० पैकी ९ गुण हे दर्शवितात कि, रेकॉर्ड नोंदणी चांगल्याप्रकारे केली जात आहे, ज्यामुळे उपकेंद्र पातळीवरील सर्व बाबींची नोंद व्यवस्थित ठेवली जात आहे. यामध्ये फक्त सूचना व तक्रारवही येथे उपलब्ध नाही.

**आलेख क्र.१० मधून असे दिसून येते कि**,

- यावरूण असे दिसून येते कि उपकेंद्रामध्ये मिळणाऱ्या सेवा – सुविधांविषयी रुग्णांचे अनुभव चांगले आहेत. इतर सुविधांबाबत उपकेंद्राविषयी व उपकेंद्रातील कर्मचारी यांच्याविषयी रुग्णांची मते चांगली आहेत.
- येथे सर्व पदे भरलेली आहेत व हे सर्व कर्मचारी चांगल्याप्रकारे सेवा देत आहेत, असे रुग्णांचे अनुभव आहेत.
- उपकेंद्र मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे सर्वांना येथे येणे शक्य होते. असे असले तरी जन आरोग्य समितीच्या माध्यमातून गावात आरोग्य शिबिरे आयोजित केली जातात. समुदाय आरोग्य अधिकारी आणि त्यांची टीम हि गावोगाव जाऊन आरोग्य सेवा देत आहेत.

**प्रकल्पाच्या माध्यमातून जन आरोग्य समिती सक्षम होऊन काय बदल झाले** ?

प्रकल्पाच्या अंतर्गत जन आरोग्य समिती सदस्य यांचे तालुका स्तरीय प्रशिक्षण संस्थेच्या वतीने घेण्यात आले, यातून पुढे जन आरोग्य समित्यांची पुर्नरचना करण्यात आली. या तयार झालेल्या समितीच्या ७ बैठका होऊन पुढील निर्णय झाले,

- उपकेंद्र इमारतीची दुरुस्ती (मुन्डवा टाकणे)
- गोळ्यांची खरेदी करणे, यासाठी ग्रामपंचायत कडे पाठपुरावा करणे.
- उपकेंद्र इमारत परिसराची मोजणी करणे.
- उपकेंद्र इमारतीस संरक्षण भिंत बांधणे, बैठकीसाठी खुर्च्या पुरविण्यासाठी ग्रामपंचायतीस सांगणे.
- संगणक व प्रिंटर पुरविण्यासाठी ग्रामपंचायतीस सांगणे.
- पाण्याची टाकी बांधणे व सौर युनिट बसविणे.

**या हे निर्णय नाही**, **तर यावर जन आरोग्य समितीने अंमलबजावणी देखील केले आणि या अंमलबजावणी मधून** – उपकेंद्र इमारतीचे मुंडवा टाकण्याचे काम पुर्ण झाले .ग्रामपंचायत पातळीवर १० हजार रुपयांची गोळ्यांची खरेदी केली. उपकेंद्र इमारत परिसराची मोजणी करण्यास एकदा महसूल विभागाचे अधिकारी येऊन गेले आहेत. मात्र अद्याप क्षेत्र निश्चिती करण्यात आले नाही. गावातील एका नागरिकाने ५ खुर्च्या उपकेंद्र इमारतीस पुरविल्या आहेत. उर्वरित बाबींसाठी पाठपुरावा सुरु आहे.

**या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे**,

- पिण्याच्या पाण्याचे वॉटर फिल्टर सुविधा नसणे, ही एक गंभीर समस्या आहे ज्याकडे त्वरित लक्ष देण्याची गरज आहे. स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हे कर्मचारी आणि रुग्ण या दोघांच्याही कल्याणासाठी आवश्यक आहे आणि ही कमतरता तातडीने दूर करण्यासाठी प्रयत्नांना प्राधान्य दिले पाहिजे.
- उपकरणांचे गुण तुलनेने उच्च असताना, दर्जेदार आरोग्य सेवांची पूर्तता सुनिश्चित करण्यासाठी वैद्यकीय उपकरणांची देखभाल आणि अद्ययावत करण्यात सतत गुंतवणूक महत्त्वाची आहे. मोठ्या माणसांसाठी वजनकाटा उपकेंद्रामध्ये उपलब्ध नाही, ते तात्काळ उपलब्ध करणे गरजेचे आहे.
- उपकेंद्रासाठी उन्हाळ्यामध्ये पाण्याचा तुटवडा जाणवत असतो, त्यामुळे अजून एका अतिरिक्त पाण्याच्या टाकीचे बांधकाम करणे गरजेचे आहे. संरक्षक भिंत व गेट बसविणे आवश्यक आहे.
- यासोबतच वृद्ध व अपंगांसाठी व्हीलचेअर किंवा रॅम्प येथे उपलब्ध नाही, ते उपलब्ध करणे आवश्यक आहे.

एकूणच, आरोग्य वर्धिनी केंद्राच्या सेवा आणि सुविधांच्या विविध पैलूंमध्ये सुधारणा करण्याच्या संधी आहेत. ओळखल्या गेलेल्या कमतरतांचे निराकरण करणे आणि सद्यस्थितीचा अधिक विकास केल्याने केंद्रातील आरोग्य सेवा वितरणाची एकूण गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढण्यास हातभार लागेल.

**आयुष्यमान भारत अंतर्गत, आरोग्य वर्धिनी केंद्राचे जन आरोग्य समिती मार्फत तयार झालेले सेवा-सुविधांचे प्रगती पत्रक (रिपोर्ट कार्ड)**

**आरोग्य वर्धिनी उपकेंद्राचे नाव - शिनोली ता.आंबेगाव जि.पुणे – ४१० ५१६**
**दिनांक - एप्रिल, २०२४**

| अ.क्र. | सोयी – सुविधा | सद्यःस्थिती | | |
|---|---|---|---|---|
| | | चांगली | साधारण | वाईट |
| २१. | स्वच्छता | | | |
| २२. | पिण्याचे पाणी | | | |
| २३. | जाणीव-जागृती साहित्य व पोष्टर | | | |
| २४. | गोळ्या व औषधी (आवश्यक औषधांची यादी आ.कें.कडून) | | | |
| २५. | उपकरणे | | | |
| ६. | आरोग्य वर्धिनीकेंद्रातील इतर पण महत्त्वाच्या सुविधा | | | |
| ७. | रेकॉर्ड / दस्तऐवजीकरण | | | |
| ८. | इतर आजारांवर प्रतिबंधक उपाय-उपचार व त्याविषयी माहितीचे साधने याबद्दल एकूण मत | | | |
| ९. | प्रत्यक्ष रुग्णांना मिळालेल्या सेवा-सुविधांच्या अनुभवातून मिळालेले एकूण गुण<br>• ६३ ते ८५ गुण मिळाल्यास चांगली परिस्थिती<br>• ४३ ते ६२ गुण मिळाल्यास साधारण परिस्थिती<br>• ४२ किंवा त्यापेक्षा कमी गुण मिळाल्यास वाईट परिस्थिती | | | |

## २. पोषणयुक्त व विषमुक्त आहार अभियान (परसबाग प्रकल्प)

पौष्टिक आणि विषमुक्त आहार अभियान, ज्याला सामान्यतः परसबाग प्रकल्प म्हणून ओळखले जाते. हा एक दूरदर्शी उपक्रम आहे जो आरोग्य, शाश्वतता आणि सामुदायिक कल्याणासाठी समर्पित आहे. पोषण, पर्यावरणीय जाणीव आणि लोककल्याण यांच्या छेदनबिंदूवर वसलेल्या, या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे की आपण जे अन्न खातो ते केवळ पौष्टिकच नाही तर हानिकारक विषारी आणि दूषित घटकांपासून मुक्त आहे याची खात्री करण्याच्या गंभीर समस्येचे निराकरण करणे. आणि पर्यायी स्रोत उपलब्ध करून देऊन. ॲनेमिया चे प्रमाण देखील कमी करणे.

यासाठी **जुलै, २०२३ ते जानेवारी, २०२४ च्या दरम्यान परसबाग प्रकल्प राबविण्यात आला.** या प्रकल्पाच्या माध्यमातून पोषणयुक्त व विषमुक्त आहार देण्यासाठीचा हा लहानसा प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला. यामध्ये कुटुंबांना परसबाग बियाणे वाटप करणे व त्यांना त्यांच्या घराशेजारील जागेत ती लावायला सांगण्यात आलेले होते. ज्यातून कुटुंबांनी ती लागवड करून कोणतेही रासायनिक खताचा वापर न करता फक्त सेंद्रिय खतावर उत्तम प्रतीचा भाजीपाल पिकवून, त्यांनी त्यांच्या आहारामध्ये आणला. यासोबतच या प्रकल्पामध्ये समाविष्ट गावांतील कुटुंबातील महिलांची एचबी तपासणी करण्यात आलेली होती. व ज्यांचा एचबी कमी आहे अशा महिलांसोबत विशेष मार्गदर्शन सत्र तज्ञाच्या मदतीने आयोजित करण्यात आलेली होती.

**उद्दिष्टे** –

- पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील गाव तेथे व घराघरात पोषणयुक्त व विषमुक्त परसबागा करणे.
- महिलांमधील ॲनेमियाचे प्रमाण कमी कमी करणे.
- शाळा, अंगणवाडी येथे परसबागा करणे. यातून मुलांना पोषण आहार मिळून त्यांचे कुपोषण दूर करणे.
- शाळेत परसबागा करताना मुलांना शेतीविषक व पर्यावरणीय ज्ञान याची कृतीशील माहिती देणे.

**क्षेत्र** –

या प्रकल्पासाठी आंबेगाव तालुक्यातील कोळवाडी (घोडेगाव) व असाणे या गावांतील १५० सर्वसाधारण कुटबांची निवड करण्यात आलेली होती.

**उपक्रम आणि कार्यपद्धती** –

या प्रकल्पाच्या अंमलबजावणी मधील या उपक्रमांचा समावेश होता.

- पहिल्या टप्यात गाव व स्वयंसेवक यांची निवड करून, स्वंयसेवकाच्या मदतीने कुटबांची निवड करण्यात आली.
- दुसऱ्या टप्यात निवड केलेल्या कुटुंबातील महिलांचे परसबाग तयार करणे व आहार याविषयी प्रशिक्षण घेण्यात आले आणि बियाणांचे वाटप करण्यात आले.
- तिसऱ्या टप्यात महिलांची एचबी तपासणी करण्यात आली व एचबी कमी असलेल्या महिलांना परसबागेचे महत्व, उपचार, ॲनेमिया (रक्तपांढरी ) याविषयी मार्गदर्शन शिबिरे घेण्यात आली.

- चौथ्या टप्प्यात परसबागांची पाहणी व या माध्यामातून झालेले सकारात्मक बदल यांची माहिती घेण्यात आली.



**अभियानाच्या पहिल्या टप्प्यात महिलांना परसबागेसाठी बियाणे वाटप करताना संस्थेचे व्यवस्थापक प्रा.स्नेहल साबळे (पहिल्या फोटो मध्ये डावीकडून पहिल्या ) व स्वंयसेवक (डावीकडून तिसरे)**




**अभियानाच्या तिसऱ्या टप्यात महिलांची एचबी तपासणी करण्यात आली व एचबी कमी असलेल्या महिलांना परसबागेचे महत्व, उपचार, ॲनेमिया (रक्तपांढरी ) याविषयी मार्गदर्शन शिबिरे घेण्यात आली.**



**चौथ्या टप्प्यात परसबागांची पाहणी व या माध्यामातून झालेले सकारात्मक बदल यांची माहिती घेण्यात आली.**

**परिणाम -**

**आलेख क्र. ०५**




**सारणी क्र. ०५**

| एचबी चे प्रमाण | संख्या |
|---|---|
| १ ते १२ एचबी | ३१ (४३%) |
| १२.०१ ते १६ एचबी | ४१ (५७%) |
| **एकूण** | ७२ (१००%) |

कोळवाडी येथील महिलांची अभियानाच्या सुरुवातीस एचबी तपासणी करण्यात आलेली होती. ज्यांचा वयोगट हा १८ ते ७५ वर्षे या दरम्यान चा होता. यामध्ये १ ते १२ एचबी असलेल्या ३१ (४३%) महिला तर १२.०१ ते १६ एचबी असलेल्या ४१(५७%) महिला निदर्शनास आल्या. स्त्रियांमधील सर्वसाधारणपणे एचबी चे प्रमाण हे १२ ते १६ च्या दरम्यान असावे,असे तज्ञाचे मत आहे. मात्र या वाडीमधील ३१(४३%) महिलांचे एचबी चे प्रमाण १२ च्या आतमध्ये असलेले निदर्शनास आले.

या महिलांसोबत विशेष मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली. व या महिलांना आहार आणि परसबागेचे महत्व सांगण्यात आले. यातील काही महिलांनी आपल्या आहारात बदल केले. परसबाग व्यवस्थितपणे पिकवली, यातून मिळणारा भाजीपाला आपल्या आहारात समाविष्ट केला. ज्यामुळे जवळपास २० महिलांचा एचबी काही प्रमाणात वाढण्यास मदत झाली. तर काहींना लोहाच्या गोळ्या सुरु करण्यात आल्या.

- या परसबाग संकल्पनेमुळे कुटुंबामध्ये विषमुक्त व पोषणयुक्त आहाराचे महत्व कळू लागले आहे. कुटुंबांमधून लहान मुलांच्या फास्ट फूड खाण्यावर नियंत्रण ठेवले जात आहे.हि अतिशय चांगली बाब आहे.
- ज्या महिलांनी परसबाग लावली आणि भाजीपाला खाल्ला आहे, अश्या महिलांना पुनः परसबाग बियाणे वाटप करून त्यांनी पुनः लागवड केलेली आहे.
- यासोबतच त्यांनी आपल्या घरातील मिरच्या वांगी,कांदे,लसून,घेवडा इत्यादीची देखील लागवड देखील केली आहे.
- किमान २० महिलांचा एचबी चे प्रमाण सुधारण्यास संस्थेला यश आलेले आहे.

**आव्हाने आणि उपाय** -

अभियानाच्या पहिल्या टप्यात  बियाणे वाटप करण्यात आलेले होते. मात्र यामध्ये जास्त पावसामुळे अनेक ठिकाणे उगवलेली बियाणे मरून गेली. त्यावर पुनः बियाणे पुरविण्यात आली. अभियानाच्या चौथ्या टप्यात जानेवारी, २०२४ नंतर पाण्याच्या कमतरतेमुळे देखील परसबाग टिकू शकली नाही. अनेक कुटुंबांनी व्यवस्थितपणे जागा तयार करून परसबाग केली नाही. त्यामुळे देखील तिचे पुढे संगोपन होऊ शकले नाही. परंतु या सगळ्यांमधून परसबागेचे महत्व कुटुंबाना समजू लागले आहे.

**भविष्यातील योजना** -

भविष्यात या अभियानाची पुनः अंमलबजावणी करताना,या पूर्वी राहिलेल्या उणीवा भरून काढल्या जातील. शाळा, अंगणवाडी येथील मुलांना यामध्ये सहभागी करून त्यांच्या शाळेच्या आणि अंगणवाडीच्या परिसरात हि परसबाग करण्यावर भर देण्यात येईल.

या अभियानासाठी पुण्यातील मा.नील पाठक यांचे आम्ही विशेष आभार व्यक्त करतो, यांनी या अभियानासाठी आर्थिक सहकार्य केले. यासोबतच ग्रामीण रुग्णालय घोडेगाव, डॉ.मोहन साळी यांनी या अभियानादरम्यान मोलाचे मार्गदर्शन केले.

## ३. निसर्गोपचार पद्धतीची आरोग्य शिबिरे

संस्थेच्या पुढाकारातून व डॉ.शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र, म्हाळुंगे तर्फे आंबेगाव च्या स्थानिक संयोजनातून संस्थेने आंबेगाव तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागात जिथे आरोग्य सुविधांची वानवा आहे, अशा ठिकाणी निसर्गोपचार पद्धतीची आरोग्य शिबिरे आयोजित करून येथील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविली आहे. दुर्गम आदिवासी आणि ग्रामीण भागात निसर्गोपचार आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करणे ही सेवा नसलेल्या समुदायांना भेडसावणाऱ्या आरोग्य विषमता दूर करण्यासाठी संस्थेने टाकलेलं महत्वपूर्ण पाऊल आहे. निसर्गोपचार शिबिरे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेवर लक्ष केंद्रित करतात, पारंपारिक ज्ञान, आहार, जीवनशैलीतील बदल आणि नैसर्गिक उपाय वापरून उपचारांच्या नैसर्गिक आणि समग्र पद्धतींचा प्रचार करतात. हा दृष्टीकोन आदिवासी आणि ग्रामीण भागात विशेषतः मौल्यवान आहे जेथे पारंपारिक वैद्यकीय सेवांचा प्रवेश मर्यादित आहे आणि नैसर्गिक उपचार पद्धतींसाठी अनेकदा मजबूत सांस्कृतिक आत्मीयता आहे.

या शिबिरांचे उद्दिष्ट स्थानिक समुदायाच्या पसंती आणि विश्वासांशी सुसंगत असलेल्या प्रवेशयोग्य, किफायतशीर आरोग्य सेवा प्रदान करणे आहे. कुपोषण, उच्चरक्तदाब, मधुमेह, श्वसनाचे विकार आणि पाचक समस्या यासारख्या सामान्य परिस्थितींसाठी तपासणी करून रोग लवकर शोधण्यात आणि प्रतिबंध करण्यात ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. योग, ध्यान आणि आहारविषयक सल्ल्यासह निसर्गोपचाराचे हस्तक्षेप दीर्घकालीन आरोग्य आणि कल्याण वाढविण्यात मदत करतात. शिवाय, शिबिरे स्थानिक लोकसंख्येला स्थानिक उपलब्ध संसाधनांचा वापर करून निरोगी जीवनशैली राखण्यासाठी, शाश्वतता आणि स्वावलंबनाला चालना देण्याबद्दल शिक्षित करतात.

**पार्श्वभूमी** -

दुर्गम समुदायांमध्ये नियमित आरोग्य तपासणीच्या महत्त्वाविषयी जागरुकता नसते, ज्यामुळे टाळता येण्याजोग्या रोगांचे उशीरा निदान होते. निसर्गोपचार शिबिरे, पारंपारिक आरोग्यसेवेच्या तुलनेत संसाधन-प्रकाश असूनही, पायाभूत सुविधा, कुशल कर्मचारी आणि मूलभूत वैद्यकीय पुरवठा यांच्या अभावामुळे अजूनही या भागात मोठ्या आव्हानांना सामोरे जावे लागते. योग्य पाठपुरावा यंत्रणेशिवाय, रूग्णांच्या दीर्घकालीन आरोग्य परिणामांचा मागोवा घेणे किंवा त्यांना दीर्घकालीन परिस्थितींसाठी सतत काळजी घेणे सुनिश्चित करणे आजही कठीण आहे.यासाठी काळजीपूर्वक नियोजन आणि सहभागाद्वारे या समस्यांचे निराकरण करून, निसर्गोपचार आरोग्य तपासणी शिबिरे ग्रामीण आणि आदिवासी भागातील उपेक्षित लोकसंख्येचे आरोग्य परिणाम प्रभावीपणे सुधारू शकतात आणि अधिक न्याय्य आरोग्य सेवा प्रणाली तयार करू शकतात.या पार्श्वभूमीवर हि शिबिरे संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेली आहेत.

**उद्देश** –

- दुर्गम भागात सुलभ आरोग्य सेवा प्रदान करणे, ज्यांना आरोग्यसेवा प्रवेशात अडथळे येतात अशा लोकसंख्येसाठी मूलभूत आरोग्य सेवा आणि सल्ला उपलब्ध करून देणे.
- प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा प्रदान करणे.
- नैसर्गिक पद्धतींचा वापर करून पोषण, स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक काळजी याबद्दल जागरुकता निर्माण करणे, व्यक्तींना त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण ठेवण्यास सक्षम करणे.

संस्थेने हि निसर्गोपचार शिबिरे राष्ट्रीय प्राकृतिक चीकीस्ता संस्थान, केंद्र – गोहे यांच्या सहकार्यांने आयोजित केलेली आहेत. आंबेगाव तालुक्यातील डॉ.शेखर बेंद्रे आरोग्य केंद्र, म्हाळुंगे तर्फे आंबेगाव येथे या शिबिरांचे प्रत्येक आठवड्याला असे मागील वर्षभर या आरोग्य शिबिरांचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात येत होते. या शिबिरांमध्ये आलेल्या नागरिकांना राष्ट्रीय प्राकृतिक चीकीस्ता संस्थान, केंद्र – गोहे येथील डॉक्टर व प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपचार करत होते.












**साध्य बाबी** –

- या शिबिरांच्या माध्यमातून ३०० पेक्षा अधिक रुग्णांना सेवा देण्यात आली. तसेच मार्गदर्शन शिबिरांमधून जाणीवजागृती करण्यात आली.
- निसर्गोपचारांचे महत्व यानिमित्ताने लोकांना देण्यात आले. ज्यामधून लोकांना त्याचे महत्व देखील पटलेले आहे.

## ४. मोफत डोळे तपासणी शिबीर

मोफत नेत्रतपासणी शिबिरे आयोजित करून समाजाचे आरोग्य सुधारण्यात संस्था महत्त्वाची भूमिका आजपर्यंत बजावत आहे. ही शिबिरे सेवा नसलेल्या लोकसंख्येसाठी, विशेषतः ग्रामीण आणि कमी उत्पन्न असलेल्या भागात प्रवेश करण्यायोग्य दृष्टी काळजी प्रदान करतात. स्थानिक आरोग्य सेवा प्रदात्यांसोबत भागीदारी करून, संस्था लोकांना सर्वसमावेशक नेत्रतपासणी, मोतीबिंदू आणि अपवर्तक त्रुटींसारख्या परिस्थितीचे लवकर निदान आणि आवश्यक असल्यास पुढील उपचारांसाठी संदर्भित देखील करते. या उपक्रमाच्या माध्यमातून संस्था समाजातील डोळ्यांच्या आरोग्याच्या महत्त्वाविषयी जागरुकता वाढविण्याचा प्रयत्न करत असते. दृष्टी कमी होण्यास प्रतिबंध करणे आणि आरोग्याच्या समानतेला चालना देताना असुरक्षित समुदायांमधील आरोग्य सेवा अंतर भरून काढण्यास यानिमित्ताने आरोग्य यंत्रणेस सहकार्य संस्था करत आहे.

### १. कोळवाडी येथे आयोजित मोफत डोळे तपासणी शिबीर

आदिम संस्थेच्या वतीने कोळवाडी येथे मोफत डोळे तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.यामध्ये १०८ लोकांची डोळ्यांची तपासणी करण्यात आले व त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.





कोळवाडी (घोडेगाव) ता.आंबेगाव येथे इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड,पुणे , रोटरी क्लब ऑफ कोथरूड,पुणे व रोटरी क्लब मेट्रो,पुणे  यांच्या सहकार्याने आणि संस्थेच्या स्थानिक संयोजनातून पौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या वर्गांमध्ये ६० पेक्षा अधिक महिला व पुरुष साक्षर होत आहेत. ते नेहमी रात्रीच्या वर्गात उपस्थित राहतात व अंकगणित आणि अक्षरओळख करून घेत आहेत. मात्र, वयाच्या मानाने अनेकांना जवळचे दिसण्यास अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये १०४ महिला व पुरुषांची डॉ.राहुल जोशी यांनी तपासणी केली व चष्मे वाटप केले. यासोबतच काहींना मोतीबिंदू, डोळ्यांचे इतर आजार आहेत असे लक्षात आलेल्या रुग्णांना ग्रामीण रुग्णालय घोडेगाव येथे संदर्भित करण्यात आले.

या शिबिराचे स्थानिक संयोजन साक्षरता वर्गाच्या स्वयंसेविका सुप्रिया मते, प्रियंका बुरसे,सुंनदा डगळे, प्रतीक्षा गिजरे यांनी केले.यावेळी संस्थेचे समीर गारे, प्रा.स्नेहल साबळे, दिपाली खामकर, अमोल गावडे हे उपस्थित होते.

**२. सुदुंबरे(संत तुकारामनगर ), ता.मावळ येथील मोफत डोळे तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप**

रोटरी क्लब ऑफ पुणे,कोथरूड व आदिम संस्थेच्या वतीने सदुंबरे, ता.मावळ येथे मोफत डोळे तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये ५५ लोकांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली व त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.





सुदुंबरे ता. मावळ येथे रोटरी क्लब ऑफ पुणे, कोथरूड यांच्या सहकार्याने आणि संस्थेच्या स्थानिक संयोजनातून प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या साक्षरता वर्गांमध्ये १६ महिला साक्षर होत आहेत. ते रात्रीच्या वेळी,साक्षरता वर्गात उपस्थित राहतात व अंकगणित आणि अक्षरओळख करून घेत आहेत. वयाने ज्येष्ठ असलेले महिला व पुरुष यातील अनेकांना जवळचे दिसण्यास अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर या डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ५५ महिला व पुरुषांची नेत्ररोग तज्ञ डॉ.सुनील पिसाळ यांनी डोळ्यांची तपासणी केली. यासोबतच काहींना मोतीबिंदू,व डोळ्यांचे इतर आजार आहेत असे लक्षात आलेल्या रुग्णांना नजीकच्या सरकारी रुग्णालयात संदर्भित करण्यात आले. यावेळी, सुमारे ३८ जेष्ठ नागरिकांना जवळचे वाचन करता येईल असे चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराचे स्थानिक संयोजन साक्षरता वर्गाच्या स्वयंसेविक अर्चना जाधव, सोनाली मेडाळे यांनी केले होते. यावेळी रोटरी क्लब ऑफ पुणे,कोथरूड चे सुहास पटवर्धन, उज्वल तावडे, चंद्रकांत दाते, आदिम संस्थेचे समीर गारे, प्रा.स्नेहल साबळे, दिपाली खामकर,राहुल कारंडे, जनवादी महिला संघटनेच्या अपर्णाताई दराडे, सिटू कामगार संघटनेचे सह सचिव गणेश दराडे इ .उपस्थित होते.

- या शिबिरांच्या माध्यामतून १५० पेक्षा अधिक व्यक्तींची डोळे तपासणी करून त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आलेले आहेत. ज्यामुळे या व्यक्तींना दिसण्याच्या अडचणीवर मात करणे शक्य झाले.

## संशोधनात्मक कार्य

संशोधन कार्य करणाऱ्या संस्थेचा उद्देश बहुआयामी आणि तिच्या ध्येय आणि उद्दिष्टांशी जुळलेला असतो. संस्था म्हणून संशोधन करण्याचे विविध उद्देश असतात. विशिष्ट क्षेत्रात ज्ञानाच्या मुख्य भागामध्ये योगदान देणे, समजून घेणे आणि नवीनतेच्या सीमा पुढे अभ्यासता यावेत म्हणून संशोधन कार्य महत्वपूर्ण भूमिका बजावते. धोरणात्मक निर्णय, धोरण तयार करणे आणि संघटनात्मक धोरणांचे मार्गदर्शन करणारे पुरावे-आधारित अंतर्दृष्टी प्रदान करण्यास देखील यामुळे मदत होते. यासोबतच संस्था किंवा त्याच्या भागधारकांसमोरील विशिष्ट आव्हाने किंवा समस्यांचे निराकरण करण्यासाठी, व्यावहारिक उपाय आणि सुधारणा विकसित करण्यास यामुळे मदत होते. या संशोधन कार्यात जेंव्हा संस्थेचे कार्यकर्ते सहभाग घेतात, तेंव्हा त्यांच्या व्यावसायिक वाढीस हातभार लागतो. त्यांच्यामध्ये नवीन कौशल्य, नवीन कल्पना, तंत्रज्ञानाची माहिती मिळते. त्यांच्या मध्ये विविध क्षमता वाढीस लागतात.

संशोधनाने हे समजणे सोपे होते कि, ज्या समुदायासोबत संस्था काम करते, त्यांच्यावर झालेल्या सकारात्मक व नकारात्मक परिणाम आहेत. हे परिणाम संस्थेच्या कामाचे मूल्यमापन करतात. तिच्या विकासाच्या संधी प्रदान करतात. यासोबत समाजाच्या गरजा आणि प्रश्नांना संबोधित करण्यासाठी, तसेच या संशोधनाच्या परिणामांना व्यापक समाजासाठी व्यावहारात आणण्यासाठी कृती कार्यक्रम आखण्यास सहाय्यक भूमिका निभावते. एकूणच कोणतेही संशोधन कार्य हे संस्थेला आपल्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी व आपले अंतिम ध्येय गाठण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी प्रदान करते .

- **संस्थेने या आर्थिक वर्षात आंबेगाव तालुक्यातील बोरघर या गावाचा सामाजिक आर्थिक अभ्यास केला.**

## १. आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रातील बोरघर गावाचा सामाजिक व आर्थिक अभ्यास

**पार्श्वभूमी व गरज** :

पुणे जिल्हा हा अवर्षण प्रवण क्षेत्र व काही प्रमाणात डोंगराळ भाग आहे. पुणे जिल्ह्याच्या पश्चिमेला आंबेगाव, जुन्नर, खेड हे तालुके सह्याद्रीच्या पर्वत रांगांनी वेढलेले आहे. हाच डोंगराळ आणि वनाच्छादित भाग अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे. याच भागात आंबेगाव तालुक्यात बोरघर हे गाव डोंगर पायथा व डोंगरावर विखुरलेल्या वस्त्यांमध्ये वसलेले आहे. या गावाल समृद्ध सांस्कृतिक वारसा, कृषी आधार, निसर्ग आणि किमान पायाभूत सुविधांमध्ये रस्त्ये उपलब्ध असूनही या गावाला आजही अनेक समस्यांचा सामना करावा लागतो आहे.

आदिवासी बहुल आणि अनुसूचित क्षेत्रात येणारे हे गाव आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर देखील मुलभूत पायाभूत सुविधांपासून वंचित आहे. या गावाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान आहे, जमिनीचे ९५% क्षेत्र हे कोरडवाहू आहे. ज्यामुळे ती निसर्गाच्या अस्पष्टतेसाठी अत्यंत संवेदनशील आहे. पारंपारिक शेती पद्धतींवर अवलंबून राहणे, प्रगत कृषी तंत्रज्ञान आणि सिंचन सुविधांपर्यंत मर्यादित प्रवेश, अनेकदा कमी उत्पादकता आणि आर्थिक अस्थिरता निर्माण करते. हंगामी बदल आणि हवामानाचा अंदाज न येणारा नमुने कृषी क्षेत्राची असुरक्षितता वाढवतात, ज्यामुळे गावकऱ्यांना आर्थिक ताणाचा सामना अनेकदा करावा लागतो. गावाला आजही अपुऱ्या पायाभूत सुविधांचा सामना करावा लागतो, ज्यात खराब रस्ते जोडणी, अविश्वसनीय वीज पुरवठा आणि अपुरे जलस्रोत यांचा समावेश आहे. या पायाभूत सुविधांची तूट आर्थिक क्रियाकलापांमध्ये अडथळा आणतात आणि जीवनाचा एकूण दर्जा कमी करतात. याव्यतिरिक्त, आरोग्यसेवा, शिक्षण आणि स्वच्छता यासारख्या अत्यावश्यक सार्वजनिक सेवांमध्ये प्रवेश मर्यादित आहे, ज्यामुळे रहिवाशांच्या सामाजिक-आर्थिक वंचिततेमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे.

गावातील तरुणांचा एक महत्त्वाचा भाग रोजगाराच्या चांगल्या संधींच्या शोधात शहरी भागात हंगामी स्थलांतरित होतो आहे.ज्यामुळे स्थानिक कामगारांची संख्या कमी होते. स्थलांतराचा हा ट्रेंड केवळ कौटुंबिक संरचना आणि सामाजिक नेटवर्कमध्ये व्यत्यय आणत नाही तर कृषी पद्धती आणि इतर स्थानिक उद्योगांना टिकवून ठेवण्याचे आव्हान देखील निर्माण करतो. गावाला पर्यावरणीय आव्हानांचा सामना करावा लागतो जसे की मातीचा ऱ्हास, पाण्याची टंचाई आणि हवामान बदलाचे परिणाम, ज्यामुळे शाश्वत कृषी पद्धती आणि एकूणच पर्यावरणीय आरोग्य धोक्यात येते. या पर्यावरणीय समस्या कमी करण्यासाठी आणि गावाच्या अर्थव्यवस्थेची दीर्घकालीन व्यवहार्यता सुनिश्चित करण्यासाठी शाश्वत विकास पद्धतींची नितांत गरज आहे.

या सर्व बाबींचा उहापोह करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रात वसलेले गाव तेथील बहुसंख्य आदिवासी समुदायाच्या पारंपारिक समूह आधारित, समता - एकता हि मूल्य जपणारी संस्कृतीस तडा न जाता, त्यांच्या मूळ ओळख न पुसता गावाचा शास्वत विकास होण्याच्या दृष्टीने हा अभ्यास महत्वाचा आहे. या संशोधनातून आजच्या स्थितीत अनुसूचित क्षेत्रातील पेसा गाव बोरघर च्या सामाजिक – आर्थिक परिस्थितीचा आढावा घेता येईल व यातून जे काही निष्कर्ष निघतील त्यावर भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्था व शासन,लोकप्रतिनिधी,समाजसेवी संस्था यांच्या माध्यमातून धोरणे ठरविणे शक्य होऊ शकते.

**अभ्यासाची उद्दिष्टे** :

१. आंबेगाव तालुक्याच्या अनुसूचित क्षेत्रांतील पेसा गाव बोरघर ची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे

२. आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रातील पेसा गाव बोरघर मधील सार्वजनिक आरोग्य सुविधांची उपलब्धता व सद्यस्थिती अभ्यासणे.

३. आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रातील पेसा गाव बोरघर चा शास्वत विकास करण्यासाठी उपाययोजना अभ्यासणे.

**निष्कर्ष** :

- अभ्यासामध्ये एकूण १०० उत्तरदात्यांचा समावेश आहे. एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी ७४ पुरुष आणि २६ महिला आहेत. ज्यामध्ये पुरुषांची टक्केवारी ७४% तर स्त्रियांची टक्केवारी हि २६% आहे. यामधून असे दिसते कि पुरुष प्रतिसादकर्त्यांचे प्रमाण मोठे आहे, जे एकूण ७४% आहे. हे सूचित करते की अभ्यासातील बहुसंख्य सहभागी पुरुष आहेत. महिला प्रतिसादकर्त्यांचे प्रमाण कमी आहे, जे एकूण २६% आहेत.अभ्यासात स्त्रियांचे प्रतिनिधित्व पुरुषांच्या तुलनेत तुलनेने कमी आहे.
- १८ ते ३५ वयोगटातील प्रतीसाद्कर्ते २०(२०%) आहेत. ३५ ते ६० वयोगटातील व ६० पेक्षा जास्त वय असलेले प्रतीसाद्कर्ते प्रत्येकी ४०(४०%) इतके आहेत. या अभ्यासामध्ये समाविष्ट असलेल्या कुटुंबसंख्येपैकी बोरघर गावठाण मधील २२(२२%), उंबरवाडी मधील २१(२१%), काळवाडी (१८(१८%), माळवाडी १६(१६%) आवळेवाडी ११(११%), घोडेवाडी ८(८%) कुटुंबांचा समावेश आहे. तर शेळकेवस्ती व अटळवाडी येथील प्रत्येकी २(२%) कुटुंबांचा समावेश आहे.
- एकूण कुटुंबांपैकी ६४ कुटुंबातील सदस्य संख्या हि १ ते ४ च्या दरम्यान आहे, ज्याची टक्केवारी ६४% आहे. तर ५ -१० च्या दरम्यान सदस्य संख्या असलेल्या कुटुंबांची संख्या ३६ इतकी आहे, ज्याची टक्केवारी ३६% इतकी आहे. सरासरी कुटुंबसंख्या ३ आहे. यावरून असे दिसून येते कि एकत्रित कुटुंबांची संख्या कमी आहे. एकत्रित कुटुंब पद्धती या गावातून लोप पावत चालली आहे.विभक्त कुटुंब पद्धती मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेली दिसते. वयाचे वितरण ० ते ६ मधील सदस्य संख्या १२ (४% ) इतकी आहे. ७ ते १८ मधील सदस्य संख्या २९(९%) आहे. १९ ते ३५ मधील सदस्य संख्या ९३(३०%) इतकी आहे. ३६ ते ६० मधील सदस्य संख्या १२२(४०%) आहे. तर ६० पेक्षा जास्त वय असलेली सदस्य संख्या ५१ आहे, एकूण लोकसंख्येच्या तुलनेत याची टक्केवारी १७% इतकी आहे. यावरून असे दिसून येते कि येथे वास्तव्यास असलेली बहुसंख्य लोकसंख्या कामकरी लोकसंख्या आहे.
- एकूण सदस्य संख्येपैकी फक्त ३ सदस्य पदवीत्तर पदवी पर्यंतचे शिक्षण घेतलेले आहेत किंवा घेत आहेत, ज्याची टक्केवारी ०.९७% इतकी आहे. तर माध्यमिक शिक्षण घेतलेली सदस्य संख्या ८८ (२८.६६%) आहे. निरक्षर असलेल्या सदस्यांची संख्या ८१(२६.३८%) इतकी आहे.
- या अभ्यासातून असे दिसून येते कि, सर्वात जास्त २६६ (८७%) सदस्य संख्या हि शेती व्यवसायात गुंतलेली आहेत. तर खाजगी आणि सरकारी नोकरी असणाऱ्या सदस्यांची संख्या अनुक्रमे १८ व १२ इतकी आहे. शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व यातूनच दुग्धव्यवसाय केला जातो.मात्र

सर्वेक्षणातून ते समोर आलेल नाही. बहुतांश सदस्य याकडे व्यवसाय म्हणून पाहत नाहीत, असे दिसते.

- ८७ सदस्यांना अद्यापही जातीचा दाखला मिळालेला नाही. तर जात पडताळणी दाखला देखील ६७ सदस्यांकडे आहे तर, २४० (७८.१७%) लोकांकडे आजही जात पडताळणी दाखला नाही. अभ्यासातून असे दिसून येते कि गावातील सदस्यांचा संस्थात्मक सहभाग हा अत्यल्प आहे. २२(७.१६%) सदस्य हे बचत गटाचे सदस्य असल्याचे दिसून येते. या सर्व महिला आहेत.
- एकूण प्रतिसादकर्त्यांपैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेली ९९ कुटुंबे आहेत, ज्याची टक्केवारी ९९% आहे. तर खुला प्रवर्गातील एका कुटुंबाचा समावेश आहे. यावरून दिसून येते कि गावातील बहुसंख्य लोकसंख्या अनुसूचित जमातीची आहे. यामधील ९५% कुटुंब हि महादेव कोळी जमातीची आहेत. तर ४% कुटुंब हि कातकरी जमातीची आहे. त्यामुळेच या गावाला पेसा कायदा लागू आहे.





- सर्वच उत्तरदात्यांच्या घराची मालकी हि स्वतःची आहे. यावरून हे दिसून येते कि येथील जवळपास सर्वच नागरिकांकडे घराची मालकी आहे.
- २० ते ३० वर्षापेक्षा जास्त काळापेक्षा जास्त दिवस गावात रहिवास असणाऱ्या कुटुंबांची संख्या ८७(८७%) असुन, बहुतांश कुटुंबे हि कायमस्वरूपाचे मूळ रहिवास असलेली आहेत.
- सर्वेक्षणातून असे दिसून येते कि, ५४(५४% ) कुटुंबांकडे अर्धे पक्के घर आहे. तर २४(२४%) कुटुंबांकडे पक्के घर आहे. २२ (२२%) कुटुंबांकडे कच्चे घर आहे. यावरुन असे दिसते कि अद्यापही अनेक कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध झालेली नाही.
- सर्वेक्षणातील एकूण कुटुंबसंख्येपैकी ८४ (८४%) लोकांना घर बांधण्यासाठी सरकारी मदत मिळाली नाही. तर फक्त १६(१६%) लोकांना घर बांधण्यासाठी सरकारी मदत मिळाली आहे. सर्वेक्षणातून असे दिसून येते कि ४० वर्षापेक्षा जास्त कालावधीची १० (१०%) घरे आहेत. ११ ते ४० पर्षापुर्वीचे बांधकाम असलेली ५०(५०%) घरे आहेत. तर १ ते १० वर्षापूर्वीचे बांधकाम असलेले ४०(४०%) घरे आहेत.
- पिवळे रेशनकार्ड असलेल्या कुटुबांची संख्या ४८(४८%) इतकी आहे. केसरी रेशनकार्ड असलेल्या कुटुंबांची संख्या ३६(३६%) इतकी आहे. तर १०(१०%) कुटूबांकडे रेशनकार्ड नाही. ६(६%) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या सर्वात जास्त ४८% आहे.

- सर्वेक्षणातून असे दिसून येते कि, ९३(९३%) कुटुंबांकडे वीजपुरवठा आहे. तर ७(७%) कुटुंबांकडे विजेचा पुरवठा नाही. ८८(८८%) लोकांकडे विजेचा मीटर आहे. तर १२(१२%) कुटुंबांकडे विजेचा मीटर नाही.
- पिण्याचा पाण्याचा स्त्रोत सार्वजनिक विहिरी असलेल्या कुटुंबांची संख्या ८२(८२%) इतकी आहे तर १८(१८%) कुटुंबांचा स्त्रोत सार्वजनिक नळ आहे.
- पाण्याच्या स्त्रोतापासून घराचे अंतर हे बहुतांश कुटुंबांचे ० ते ५०० मीटर इतके आहे.
- गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या समस्यांचा सामना करावा लागतो. पिण्याचे पाणी पिण्यायोग्य नसणे, अनेकांना पाणी लांबून व दऱ्याखोऱ्यातुन आणावे लागते.
- पाणी स्वच्छ करण्याच्या पद्धतीविषयी जाणीवजागृती नाही. बहुतांश कुटुंब हि पाणी स्वच्छ करण्यासाठी मेडीक्लोरचा वापर करतात तर पाणी साठविण्यासाठी हंड्याचा वापर केला जातो.
- सांडपाणी देखील उघड्यावर सोडले जाते, काहीच कुटुंब हि सांडपाणी परसबागेत सोडतात.
- एकूण कुटुंबसंख्येपैकी ८०(८०%) कुटुंबातील सदस्य शौचालयाचा वापर करत आहेत. १६(१६%) कुटुंबांकडे शौचालय नाही. तर ४(४%) कुटुंबांकडे शौचालय आहे, पण वापर करत नाहीत.
- कुटुंबांच्या वस्तीला येण्यासाठी माळवाडी वगळता सर्वच ठिकाणी पक्के रस्ते आहेत. यावरून हे लक्षात येते कि दळवळण सुविधा या गावात चांगली आहे. काही ठिकाणी नवीन रस्त्यांची व दुरुस्ती करण्याची कामे सुरु आहेत.





- दीर्घ आजार असलेल्या व्यक्ती असलेली कुटुंबसंख्या २६(२६%) इतकी आहे. यामध्ये मुख्यतः मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा, पैरालाइज (Paralysis) इत्यादी. आजार दिसून येतात.
- कोविड च्या काळात एकूण कुटुंबसंख्येपैकी १० (१०%) कुटुंबातील सदस्यांना कोविड – १९ ची लागण झालेली होती. मात्र मृत्यू झालेले नाही.
- सर्वेक्षणातून असे दिसून येते कि, ९०(९०%) कुटुंबातील सदस्य हे उपचारासाठी पुढे शासकीय ग्रामीण रुग्णालयात जुन्नर व घोडेगाव येथे जातात. यासोबतच खाजगी रुग्णालयात जाण्याचे प्रमाण अधिक आहे.
- ९०% कुटुंबातील सदस्यांना रुपये ५००० पर्यंत मासिक खर्च मोजावा लागतो. तर १०(१०%) कुटुंबांना रुपये २००० पर्यंतचा खर्च येतो.

- सर्वेक्षणावेळी सदस्य शिक्षण घेत असलेल्या कुटुंबांची संख्या ४०(४०%) आहे. तर सदस्य संख्या ८२ इतकी आहे.
- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या एकूण सदस्यांची संख्या ४५ इतकी आहे.
- उच्च शिक्षण घेताना कुटुंबातील सदस्यांना आर्थिक क्षमता नसणे, उच्च शिक्षण घेण्यासाठी शैक्षणिक संस्थांची फी इत्यादी अडचणी येतात.
- शेती करत असलेल्या कुटुंबांची संख्या ९६(९६%) इतकी आहे. तर स्वतः ची शेत जमीन असलेल्या कुटुंबांची संख्या ९२(९२%) इतकी आहे.
- शेती बहुतांश कोरडवाहू असुन या शेतीमधून उन्हाळी हंगामातून पिके घेतली जात नाहीत. तर पावसाळ्यात भात हे प्रमुख पिक घेतले जाते. हिवाळी हंगामात गावरान हरभरा, शाळू व वटाणा हि पिके घेतली जातात. ९९(९९%) कुटुंबाच्या शेतीसाठी पाण्याचा स्रोत फक्त वरून पडणारा पाऊस आहे.
- १५(१५%) कुटुंबांनी शेतीसाठी कर्ज घेतले आहे. तर ८५(८५%) कुटुंबांनी कोणत्याही स्वरूपाचे कर्ज घेतले नाही.
- पीकविमा घेणाऱ्या कुटुंबांची संख्या ५०(५०%) इतकी आहे. आरोग्य विमा, पशूंचा विमा नोंदविणाऱ्या कुटुंबांची संख्या अतिशय कमी आहे.
- पशुपालन करणाऱ्या कुटुंबांची संख्या ६५(६५%) इतकी आहे. तर ३५(३५%) सदस्य पशुपालन करत नाहीत.पशुपालनामध्ये शेळी, देशी गाय, म्हैस, बैल यांचा समावेश आहे.
- दुग्धव्यवसाय करणाऱ्या कुटुंबांची संख्या २५(२५%) इतकी आहे. गावातच २ ते ५ किमी अंतराच्या आतमध्ये दुध डेअरी आहे. पशुधन मालकांना पशुपालन करताना चारा नसणे, पाणी उपलब्ध नसणे इत्यादी समस्यांचा सामना करावा लागतो.
- गावातील कुटुंबात उपजीविकेसाठी विविध व्यवसाय केले जातात. त्यात मुख्य व्यवसाय शेती व पशुपालन हा आहे.
- गावातील कुटुंब हि स्वयंपाकासाठी लाकूड, गोवऱ्या, गॅस इत्यादी इंधन वापर केला जातो. गॅस महाग असल्याने लाकूड हा उपलब्ध पर्यायाचा जास्तीत वापर करण्यात येतो.
- गावातील कुटुंबांचे रोजगाराचे प्रमुख साधन शेती हे आहे, ९६(९६%) कुटुंबांचा रोजगाराचा प्रमुख स्रोत शेती हा आहे. तर ७०% कुटुंब हि शेतमजुरी करतात. स्थानिक रोजगाराच्या स्रोत नसल्यामुळे खाजगी कंपनीमध्ये काम करणाऱ्या सदस्यांची कुटुंबसंख्या ५०% आहे. ६५(६५%) कुटुंबांतील सदस्य संख्या पशुपालन करतात. तर २५(२५%) कुटुंबांतील सदस्य संख्या दुग्धव्यवसाय करतात. या रोजगाराच्या साधनांमधून सरासरी मिळणारे मासिक उत्पन्न शेती – रुपये १ ते ५ हजार, शेतमजुरी रुपये १ ते २ हजार, खाजगी कंपनी रुपये ८ हजार, सरकारी नोकरी रुपये ६० हजार इतके आहे. तर पशुपालन व्यवसायातून कुटुंबांना मिळणारे सरासरी उत्पन्न हे रुपये १ ते ५ हजार इतके आहे. दुग्धव्यवसायातून मिळणारे सरासरी उत्पन्न हे ४ हजार रुपये प्रति महिना आहे.
- गावातील कुटुंबांतील सदस्य हे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. ६०(६०%) कुटुंबातील सदस्य हे रोजगारासाठी बाहेर गावी स्थलांतर करत असल्याचे दिसून येते. तर ४०(४०%) कुटुंबांतील सदस्य हे रोजगारासाठी कुठेही स्थलांतर करत नाहीत.

- गावातील ६० % कुटुंबांतील सदस्य हे रोजगारासाठी बाहेर गावी स्थलांतर करतात. यामधील ३०% कुटुंबांतील सदस्य हे दैनंदिन स्थलांतर करतात. हे स्थलांतर मुख्यतः शेतमजुरी साठी केले जाते. तर ३ ते ६ महिने कालावधीसाठी स्थलांतर करणाऱ्या सदस्यांची कुटुंबसंख्या ४०% आहे. तर ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी स्थलांतर करणाऱ्या सदस्यांची कुटुंबसंख्या ३०% आहे.
- गावातील मोटर सायकल असलेल्या कुटुबांची संख्या ४०(४०%) आहे. तर चारचाकी व सायकल असणाऱ्या कुटुंबाची संख्या प्रत्येकी १०(१०%) इतकी आहे.
- सर्वेक्षणातून दिसून येते कि गावातील ६०(६०%) कुटुंबांकडे कुकर आहे तर ४० (४०%) कुटुंबांकडे नाही. २०(२०%) कुटुंबांकडे फ्रीज आहे तर ६०(६०%) कुटुंबांकड नाही.
- साधा फोन वापरणाऱ्या कुटुंबांची संख्या ८०% आहे तर २०% कुटुंबांकडे साधा फोन नाही. स्मार्ट फोन वापरणाऱ्या कुटुंबांची संख्या ९०% आहे तर १०% कुटुंबांकडे स्मार्ट फोन नाही.
- रोजगार हमी योजना ६०(६०%) कुटुंबातील सदस्यांना माहिती आहे व लाभ घेतला आहे. यासोबत पोस्ट बचत योजनेची लाभधारक कुटुंबे हि ७०(७०%) इतकी आहेत. यावरून असे दिसू येते कि अनेक शासकीय योजना या स्थानिक पातळीवर पोहचत नाहीत किंवा त्यांची पुरेशी माहिती नागरिकांना मिळत नाही.परिणामी त्यांना लाभ देखील मिळत नाही.
- गावात होणाऱ्या ग्रामसभेला जाण्याचे प्रमाण जास्त दिसून येते. ५६(५६%) कुटुंबातील सदस्य हे ग्रामसभेला नेहमी जात असतात. तर २०(२०%) कुटुंबातील सदस्य हे कधी कधी जात असतात. यावरून येथील नागरिकांच्या राजकीय सहभागाची सक्रियता लक्षात येते.
- गावातील बहुतांश कुटुंबांतील सदस्यांना गावात काम करत असलेले ग्रामपंचायत सदस्य,लोकप्रतिनिधी, शासकीय कर्मचारी यांच्याविषयी माहिती आहे, त्यांची नावे माहिती आहेत. यावरून असे दिसून येते कि हे प्रतिनिधी या कुटुंबांपर्यंत पोहचलेले आहेत.
- सर्वेक्षणातून असे दिसून येते कि एकूण कुटुंब संख्येपैकी १००(१००%) कुटुंबातील सदस्यांची बँक खाती आहेत. तर ८०(८०%) कुटुबांतील सदस्यांची पोस्टल बँकेत खाते आहे. ७६(७६%) शेतकरी कुटुंब हि सोसायटीचे खातेदार आहेत. हि आकडेवारी कुटुबांतील एक किंवा त्यापेक्षा जास्त असू शकते. यावरून दिसून येते कि सर्वच कुटुंब हि आर्थिक व्यवहार करतात, बचत देखील करतात.

**सारांश** :

'आंबेगाव तालुक्यातील पेसा गाव बोरघरचा सामाजिक व आर्थिक अभ्यास' या संशोधन अभ्यासाचे उदिष्टे

१. आंबेगाव तालुक्याच्या अनुसूचित क्षेत्रांतील पेसा गाव बोरघर ची सामाजिक व आर्थिक स्थिती अभ्यासणे
२. आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रातील पेसा गाव बोरघर मधील सार्वजनिक आरोग्य सुविधांची उपलब्धता व सद्यस्थिती अभ्यासणे.
३. आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रातील पेसा गाव बोरघर चा शास्वत विकास करण्यासाठी उपाययोजना अभ्यासणे.

हि समोर ठेऊन हा संशोधन अभ्यास पुर्ण केला आहे. अभ्यासाअंती हि उदिष्टे साध्य झाल्याचे अभ्यासकाचे मत आहे. अभ्यासाच्या शेवटी संशोधकाचे असा निष्कर्ष आहे कि, गावातील नागरिकांची सामाजिक आर्थिक

स्थिती काही प्रमाणात उंचावलेली आहे. मात्र अजूनही अनेक घटकांना पायाभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागतो. प्रस्तुत अभ्यासाच्या अंती गृहीतके सिद्ध झालेली आहेत. यामधील पहिले गृहीतक रोजगाराच्या संधी जिथे सहज उपलब्ध होत नाही, अश्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. अभ्यासाच्या निष्कर्षा मधून असे दिसून येते कि ९६% कुटुंबांचा प्रमुख व्यवसाय हा शेती आहे. तर हि सर्वच शेती कोरडवाहू आहे. या व्यतिरिक्त येथील नागरिकांना आर्थिक उत्पनाचे स्रोत नाही. परिणामी ६०% कुटुंबांतील सदस्य हे रोजगारासाठी स्थलांतर करत असल्याचे दिसून येते.

सामाजिक आणि आर्थिक स्थिती उंचावण्यामध्ये शासकीय हस्तक्षेप महत्वाची भूमिका पार पाडतो. या गावात शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांची संख्या कमी दिसून येते. येथील नागरिकांसाठी महत्वाची असलेली घरकुल योजना ८०(८०%) कुटुंबांना याचा लाभ मिळाला नाही. हा चिंतेचा विषय आहे. तर गावात असलेल्या कातकरी समुदाय पायाभूत सुविधा, मुलभूत गरजांपासून पूर्णतः वंचित आहे.

या निष्कर्षांच्या आधारे हे स्पष्ट होते की आंबेगाव तालुक्यातील पेसा गाव बोरघर मध्ये सेवांची उपलब्धता, सुलभता आणि दर्जा यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. शासकीय योजनांचा आवाका वाढवणे, सेवांची वारंवारता वाढवणे, रोग प्रतिबंधक आणि नियंत्रण उपाय सुधारणे गरजेचे आहे. रोजगारासाठी स्थानिक पर्याय विकसित करून आर्थिक अडचणी परिणामी आर्थिक स्थिती सुधारणे गरजेचे आहे. स्थानिक समुदायांचे जीवनमान सुधारण्यास हातभार लागू शकतो. या अभ्यासाचे निष्कर्ष धोरणनिर्माते आणि भागधारकांना अनुसूचित क्षेत्रात शासकीय योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी लक्ष्यित हस्तक्षेप आणि धोरणे विकसित करण्यासाठी आधार म्हणून काम करू शकतात, ज्यामुळे शेवटी आंबेगाव तालुक्यातील पेसा गाव बोरघर व अश्या अनेक गावांना व त्यातील समुदायांना याचा फायदा होईल.

**सूचना** :


प्रस्तुत संशोधनातून उपलब्ध माहितीचा व सादरीकरणाचा अभ्यास केल्यानंतर या संशोधन अभ्यासाचे परिणाम समोर आले आहेत जे काही सकारात्मक तर काही नकारात्मक देखील आहेत. त्या आधारे आंबेगाव तालुक्यातील पेसा गाव बोरघर विकसित करण्यासाठी आणि तेथील नागरिकांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सर्वसमावेशक आणि बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. या संशोधन अभ्यासातून येथे काही सूचना करत आहे.

- येथील शेती कोरडवाहू व सिंचनाची शक्यता कमी असली तरी कमी पाण्यात उच्च उत्पादन देणाऱ्या विविध बियाण्यांचा वापर, कार्यक्षम सिंचन पद्धती आणि सेंद्रिय शेती यासह आधुनिक कृषी तंत्रांचा शेतकऱ्यांना परिचय करून देणे गरजेचे आहे, व त्यासोबत त्यांना प्रशिक्षित करणे देखील गरजेचे आहे. राज्याचा कृषी विभाग व गावात असलेले कृषी सहाय्यक यासाठी महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.
- एकाच पिकावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि उत्पन्नाची स्थिरता वाढवण्यासाठी पीक विविधतेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. येथील जमिनीवर काजू, जांभूळ , फणस, शेवगा,लिंबू हि पिके व बांबूची देखील शेती करता येऊ शकते.
- सौदेबाजीची शक्ती सुधारण्यासाठी आणि उत्पादनांच्या विक्रीसाठी बाजारपेठांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे प्रवेश करण्यासाठी शेतकरी सहकारी संस्थांची स्थापना किंवा शेतकरी गटांची स्थापना करता येऊ शकते.

- आरोग्याच्या समस्या सोडविण्यासाठी उपकेंद्राच्या मार्फत व जन आरोग्य समितीच्या माध्यमातून गाव व वाड्या – वस्त्यांच्या पातळीवर गाव आरोग्य शिबिरे, समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या भेटी घडवून आणणे महत्वाचे आहे.
- पोषण, माता आरोग्य आणि प्रतिबंधात्मक काळजी यावर नियमित आरोग्य जागरूकता कार्यक्रम आयोजित करायला हवेत.
- शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी अंगणवाडी सेविका, शिक्षक यांचे नियमित प्रशिक्षण व कार्याचे मूल्यमापन करायला हवे. यासोबतच शाळेच्या इमारती या पायाभूत सुविधांयुक्त व संगणक जोडणी करणे आवश्यक आहे. तसेच पौढ साक्षरता कार्यक्रम गावात राबवणे आवश्यक आहे. यासाठी स्थानिक संस्था मदत करू शकतात.
- लघु-उद्योग जसे कि दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि हस्तकला यासारख्या लघु उद्योगांच्या स्थापनेला प्रोत्साहन द्यायला हवे. मायक्रोफायनान्स आणि व्यवसाय प्रशिक्षण देऊन उद्योजकतेला प्रोत्साहन द्यायला हवे. आदिवासी विकास विभागाच्या मदतीने वनधन गट तयार करून, शेतकरी उत्पादक गट तयार करून स्थानिकांना रोजगाराचे पर्याय उपलब्ध होतील. परिणामी स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.
- ग्रामीण रोजगार आणि विकासाच्या उद्देशाने सरकारी योजना आणि अनुदानाचा लाभ गरजू लाभार्थी घटकांना दिला पाहिजे.
- गावच्या विकासासाठी सामाजिक मेळावे, तरुण मंडळे आणि मनोरंजनात्मक उपक्रमांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.
- स्वयं-सहायता गट, आर्थिक साक्षरता कार्यक्रम आणि व्यावसायिक प्रशिक्षणाद्वारे महिला सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. यासाठी राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका मिशन (NRLM ) चा उपयोग होऊ शकतो.
- पर्यावरणीय संतुलन सुधारण्यासाठी सामाजिक वनीकरण कार्यक्रम सुरू करणे.
- सौर आणि बायोगॅस यांसारख्या अक्षय ऊर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन देणे.
- पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सक्रिय नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करून स्थानिक प्रशासन संस्था (ग्रामपंचायत), शासकीय संस्था मजबूत करणे गरजेचे आहे.
- नियोजन आणि अंमलबजावणी प्रक्रियेत स्थानिक शासकीय यंत्रणा, एनजीओ, लोकप्रतिनिधी आणि रहिवाशांसह सर्व भागधारकांना सहभागी करून घायला हवे.
- देखरेख आणि मूल्यमापन, प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आणि आवश्यक समायोजन करण्यासाठी एक मजबूत निरीक्षण आणि मूल्यमापन यंत्रणा स्थापित करणे गरजेचे आहे.
- सरकारी अनुदान, कॉर्पोरेट्सकडून CSR फंड आणि परोपकारी लोकांचे योगदान यासारखे विविध निधी स्त्रोत एकत्रित करणे आवश्यक आहे.

या सूचनांचा/उपायांचा अवलंब करून, पेसा गाव बोरघर शाश्वत सामाजिक-आर्थिक विकास साधू शकते, तेथील रहिवाशांचे जीवनमान सुधारू शकते.

**नकाशा क्र.१ बोरघर गावाचा भौगोलिक सीमा दर्शविणारा नकाशा**




(स्रोत – ग्रामपंचायत कार्यालय, बोरघर )

## मदतीचे व इतर कार्य

सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणामुळे ज्यांना संधी मिळत नाहीत, अशा घटकांसाठी संस्थेने नेहमी सहाय्यक भूमिका निभावली आहे. यासोबतच संस्थेने आपत्ती आणि संकटांनी प्रभावित झालेल्या समुदायांना तात्काळ मदत आणि दीर्घकालीन पुनर्प्राप्ती सहाय्य प्रदान करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. स्थानिक संस्था, शासकीय यंत्रणा आणि स्थानिक भागीदार यांच्यासोबत आम्ही आमचा समुदायांसाठी प्रभाव वाढवतो आणि आमचे हस्तक्षेप सांस्कृतिकदृष्ट्या संवेदनशील आणि समुदाय-चालित आहेत. आमचे ध्येय केवळ तात्काळ दुःख कमी करणेच नाही तर भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सक्षम, अधिक लवचिक समुदाय तयार करणे देखील आहे. याच भूमिकेतुन्न संस्थेने या आर्थिक वर्षात मदतीचे कार्य केले आहे, संस्थेच्या कार्यकर्त्यांनी यामध्ये महत्वाची भूमिका निभावली आहे.

### १. आदिवासी कातकरी समुदायातील विद्यार्थिनीचा सत्कार

अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अभ्यास आणि संघर्ष करत इंदिरानगर (शिनोली) येथील कु.उमा विलास वाघ या आदिवासी कातकरी समाजातील युवतीने इयत्ता १२ वीची परीक्षा ७८.६७% गुणांसह यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. तिच्या अभ्यास आणि संघर्षाची दखल म्हणून तिला संस्थेतर्फे सन्मानित करण्यात आले. तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी संस्था तिला आवश्यक ते सहकार्य करणार असल्याचे संस्थेचे सचिव डॉ.अमोल वाघमारे यांनी सांगितले.

मंचर – भीमाशंकर रस्त्यावर असणाऱ्या शिनोली येथे इंदिरानगर नावाची कातकरी व ठाकर समुदायाची वस्ती आहे. नेहमीच दुर्लक्षित असलेल्या आदिवासी समुदायाच्या वस्तीप्रमाणे या वस्तीमध्ये आजही पिण्याच्या पाण्यासाठी येथील समुदायाला संघर्ष करावा लागतो. शिनोली या पायाभूत सुविधांयुक्त असलेल्या ग्रामपंचायत चा भाग असलेली वस्ती मुख्य रस्त्यापासून व गावापासून १०० मीटर अंतरावर आहे. मात्र आजही येथे पायाभूत सुविधां पोहचल्या नाहीत. शासकीय योजना तर नाहीच !



(उमा वाघ या विद्यार्थिनीचा सत्कार व तीला आर्थिक मदत करताना संस्थेचे पदाधिकारी )

याच वस्तीमध्ये उमा राहते. घरची परिस्थिती बेताची असल्याने व आर्थिक अडचणी असल्यामुळे २०१८ मध्ये १० वीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमाला ११ वी मध्येच शिक्षण सोडायला लागले होते. आई आणि बहिण आजारी असल्याने तिने वडिलांसोबत मासेमारी, शेतमजुरी, दुकानात काम अशी भेटेल ती कामे केली.मात्र तिची शिकण्याची इच्छा कायम होती. २ वर्षापूर्वी प्रा.स्नेहल साबळे या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये 'महाराष्ट्रातील आदिवासी कातकरी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास' यावर पीएचडी चा अभ्यास करताना त्यांची आणि उमाची भेट इंदिरानगर मध्ये झाली होती. पुढे तिला शैक्षणिक मदत व पुनः ११ वीला प्रवेश मिळवून देण्यात आला. या मदतीचे आणि सहकार्याचे चीज करत आज तिने १२ वीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. पुढे ती उच्च शिक्षण घेणार आहे, आदिवासी कातकरी समाजातील इतर तरुणींसाठी आशा आणि प्रेरणा म्हणून तिला शिक्षण घ्यायचं आहे.
यावेळी संस्थेचे डॉ. अमोल वाघमारे, प्रा. स्नेहल साबळे, समीर गारे, बोरघर ग्रामपंचायत सदस्य आणि एसएफआय पुणे जिल्हा अध्यक्ष दीपक वालकोळी, दिनेश वालकोळी, सतीश लोहकरे जनवादी महिला संघटनेच्या सुप्रिया मते इत्यादी उपस्थित होते.

# विशेषदिनानिमित्ताचे कार्यक्रम

माणूस हा सामाजिक प्राणी आहे, समाजामध्ये घडणाऱ्या घटनानांशी त्याचा जवळचा संबंध आणि या घटनांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे परिणाम हा त्याच्यावर होत असतो. याच अनुषंगाने संस्थेसोबत जोडलेल्या आणि संस्थेत काम करत असलेल्या व्यक्तींची सांस्कृतिक आणि ऐतिहासिक जागरूकता वाढावी, या महत्वपूर्ण दिवसाचे महत्व समजावे या उद्देशाने संस्था नेहमी आपल्या कार्यालयात विशेष दिनांच्या निमित्ताने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करत असते.

या निमित्ताने संस्थेसोबत जोडलेल्या आणि संस्थेत काम करत असलेल्या व्यक्तींचे अनौचारिक शिक्षण होत असते. या दिवसांचे ऐतिहासिक संदर्भ , हे दिवस महत्त्वाचे का आहेत आणि ते संस्थेच्या ध्येय आणि मूल्यांशी कसे संबंधित आहेत याबद्दल माहिती होत असते. समुदायाबद्दल असलेली आपली बांधिलकी संवर्धित करण्याचा त्या निमित्ताने प्रयत्न होत राहतो. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्व व्यक्ती समूह एकत्र येतात, वैचारिक देवाणघेवाण होत राहते. सकारात्मक वातावरण निर्मिती होत राहते. सातत्यपूर्ण नवीन विचार कार्यकर्त्यांना देऊ केल्याने त्यांच्यामध्ये काम करण्यास उर्जा मिळते. टीम वर्क वाढण्यास मदतहोते. हे सर्व होण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन संस्थापातळीवर करण्यात येते.

### १.घोडेगाव येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

संस्था व एसएफआय संघटनेच्या वतीने संस्थेच्या कार्यालयात कॉम्रेड शाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने बोलताना आदिम संस्थेचे राजू घोडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ' दीड दिवस शाळेत गेलेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याच्या , कार्याच्या केंद्रस्थानी माणूस आणि मानवतावाद होता.म्हणून त्यांनी त्यावेळी होणाऱ्या माणसाच्या शोषणाचे वास्तव आपल्या साहित्यातून मांडले. मात्र आज सर्वांच्या केंद्रस्थानी पैसा आहे. आज देशात सुरु असलेल्या शोषणाविरुद्ध कोणीच बोलत नाही,हि मोठी शोकांतिका आहे. यावेळी बोलताना राजू घोडे यांनी मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार समीर गारे यांनी मांडले. यावेळी आदिम संस्थेचे बाळू काठे, एसएफआय आंबेगाव तालुका समितीचे सचिव समीर गारे, अध्यक्ष दिपक वालकोळी , राहुल कारंडे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

## २.घोडेगाव येथे संविधान दिन साजरा

आदिम संस्था, एसएफआय, किसान सभेच्या आदिम संस्थेच्या कार्यालयात घोडेगाव येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (.आय.एफ.एस),अखिल भारतीय किसान सभा, आंबेगाव तालुका समितीच्या वतीने घोडेगाव येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.






या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या विशेष व्याख्यान कार्यक्रमात ॲड. दिपाली मोरे यांनी 'भारतीय संविधान आजची आव्हाने व पुढील दिशा' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना व नागरिकांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले कि, 'संविधान समजून घेणे आणि त्याचा लाभ देशातील शेवटच्या घटका मिळण्यासाठी त्याची प्रभावी अंमलबजावणी साठी प्रयत्न करणे हि आजच्या तरुणाईची जबाबदारी आहे. आजच्या विषमतेच्या वातावरणात संविधानच आपल्या सर्वांना भारतीय असल्याची ओळख प्राप्त करून देते आहे.'

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना किसान सभेचे राजू घोडे यांनी सांगितले कि, 'आजची लोकशाही व्यवस्था हि प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था आहे, संविधानात अपेक्षित असलेली आणि खऱ्या अर्थाने ७३ व्या घटना दुरुस्तीने लोकशाही गणराज्य घडविण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आणि गण म्हणजेच नागरिकांना, ग्रामसभेला विशेष महत्व आणि सत्तेचे विकेंद्रीकरण केले. ग्रामसभा हि लोकशाहीचे सर्वोत्तम उदाहरण आहे.'

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिम संस्थेचे समीर गारे यांनी केले, तर सूत्रसंचालन एसएफआय चे आंबेगाव तालुका सहसचिव योगेश हिले, आभार जिल्हा अध्यक्ष अविनाश गवारी यांनी मांडले.संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन करून कार्क्रमाचा समारोप करण्यात आला. यावेळी आदिम संस्थेचे स्नेहल साबळे,समीर गारे, दिपाली खामकर, एसएफआय चे पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी, आंबेगाव तालुका अध्यक्ष आणि बोरघर गावचे सदस्य दिपाली वालकोळी, फुलवडे गावचे उपसरपंच तेजस्विनी भारमळ, किसान सभेचे राज्य जिल्हा सहसचिव अशोक पेकारी, ॲड. अश्विनी दगडे, गाडेकर बाबा, कुष्णा गाडेकर, किसान सभेचे अर्जुन काळे, सुभाष भोकटे, दत्ता गिरंगे आदी उपस्थित होते.

### ३.घोडेगाव येथे शहीद दिन साजरा

आदिम संस्कृती अभ्यास,संशोधन व मानव विकास केंद्र, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) आंबेगाव तालुका समिती यांच्या संयुक्त विद्यमाने घोडेगाव येथे शहीद दिन साजरा करण्यात आला.



भारताला स्वतंत्र मिळवून देण्यासाठी स्वतःच्या प्राणाची आहुती देण्याऱ्या भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या स्मर्णार्थ देशभरात शहीद दिवस साजरा केला जातो. २३ मार्च रोजी इंग्रजांनी भगत सिंग, राजगुरु आणि सुखदेव या भारतमातेच्या वीर जवानांना फाशी दिली होती. त्यांच्या या बलीदानामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्याला नवी दिशा मिळाली. त्यामुळेच आजचा दिवस शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो.

शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. शहिदांच्या जीवनावर चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना प्रा.स्नेहल साबळे यांनी सांगितले कि , ‘शहीद भगतसिंग यांनी आपल्या छोट्याशा आयुष्यात वैचारिक क्रांतिची ज्योत पेटवली. भगतसिंगांची लढाई केवळ राजकीय स्वातंत्र्यापुरतीच मर्यादित नव्हती तर ती सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी होती. ब्रिटीशांच्या जोखडातून मातृभूमीला मुक्त करण्याबरोबरच समाजवादी रचनेवर आधारित समाज निर्माण करण्याचे भगतसिंग यांचे स्वप्न होते. सर्व माणसांच्या काही अत्यावश्यक गरजा आहेत. सर्वांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार या अत्यावश्यक गरजा भागविण्याची सोय होणे म्हणजे समाजवाद, अशी भगतसिंगांनी व्याख्या केली होती.’

यावेळी आदिम संस्थचे समीर गारे, राहुल कारंडे, एसएफआय चे रोहिदास फलके, डीवायएफआय चे महेश गाडेकर आदी उपस्थित होते.

पुढारी

## तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी पुढे या : अॅड. दिपाली मोरे

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

संविधानातील तरतुदींच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी युवक -युवतींनी पुढे यावे, असे आवाहन अॅड. दिपाली मोरे यांनी केले. आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) आणि अखिल भारतीय किसान सभा आंबेगाव तालुका समितीच्या वतीने घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित केलेल्या विशेष व्याख्यान कार्यक्रमात अॅड. मोरे यांनी 'भारतीय संविधान आजची आव्हाने व पुढील दिशा' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना व नागरिकांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना किसान सभेचे राजू घोडे यांनी सांगितले की, आजची लोकशाही व्यवस्था ही प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था आहे. संविधानात अपेक्षित असलेली आणि खऱ्या अर्थाने ७३ व्या घटनादुरुस्तीने लोकशाही गणराज्य घडविण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला. ग्रामसभा हे लोकशाहीचे सर्वोत्तम उदाहरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविक आदिम संस्थेचे समीर गारे यांनी केले, तर सूत्रसंचालन एसएफआयचे आंबेगाव तालुका सहसचिव योगेश हिले यांनी केले, तर आभार अविनाश गवारी यांनी मानले. संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या वेळी आदिम संस्थेचे स्नेहल साबळे, समीर गारे, दिपाली खामकर, राहुल कारंडे, एसएफआयचे पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी, एसएफआय आंबेगाव तालुकाध्यक्ष आणि बोरघर ग्रामपंचायत सदस्य दीपक वालकोळी, फुलवडेच्या उपसरपंच तेजस्विनी भारमळ, किसान सभेचे राज्य जिल्हा सहसचिव अशोक पेकारी, अॅड. अश्विनी दगडे, कृष्णा गाडेकर, किसान सभेचे अर्जुन काळे, सुभाष भोकटे, दत्ता गिरंगे आदी उपस्थित होते.

My Gramin Edition
Nov 28, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वनपरिक्षेत्र अधिकारी महेश गारगोटे.

## 'प्रामाणिकपणे अभ्यास केला तर यश निश्चित'

**मंचर :** ग्रामीण भागातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश मिळवून आपल्या गावाचे आणि शाळेचे नाव सार्थक करत आहेत. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास केला तर यश निश्चित आहे, असा सल्ला घोडेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी महेश गारगोटे यांनी दिला. आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र संचलित व आदिवासी सेवक शंकर विठू केंगले यांच्या स्मृतीपर घोडेगाव (ता. आंबेगाव) येथील ज्ञानसरिता अभ्यासिकेत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी गारगोटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजू घोडे होते. आदिम संस्थेचे समीर गारे, एसएफआय आंबेगाव तालुका समितीचे अध्यक्ष दीपक वालकोळी, सहसचिव योगेश हिले आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन एसएफआय आंबेगाव तालुका समितीने केले. प्रास्ताविक रीना मुंढे यांनी केले. सूत्रसंचालन प्रफुल्ल वाकचौरे यांनी केले. तर रोहिदास फलके यांनी आभार मानले.

## कर्तृत्वाला मेहनतीचा रंग असतो : किरण भालेकर

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना सातत्यपूर्ण अभ्यास करावा. यश मिळवण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहावे. कर्तृत्वाला मेहनतीचा रंग असतो, असे मत घोडेगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक किरण भालेकर यांनी व्यक्त केले.



घोडेगाव येथे स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहायक पोलिस निरीक्षक किरण भालेकर.

आदिम संस्थेच्या वतीने घोडेगाव (ता. आंबेगाव) येथे आदिवासी सेवक शंकरराव विठू केंगले यांच्या स्मृतीपर स्पर्धा परीक्षा करणाऱ्या मुलांसाठी ज्ञानसरिता अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे. या अभ्यासिकेत आद्यक्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या जयंतीचे औचित्य साधत व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी भालेकर बोलत होते. आदिम संस्थेचे डॉ.अमोल वाघमारे यांनी अभ्यासिका अभ्यास व ग्रंथालय यांचे महत्त्व नमूद केले. किसान सभेचे नेते व बोरघर ग्रामपंचायत सदस्य राजू घोडे यांनी आद्यक्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या कार्याचा परिचय करून दिला. या वेळी पाटण-पिंपरी ग्रुप ग्रामपंचायतचे नवनिर्वाचित सरपंच लक्ष्मण मावळे, बोरघर ग्रामपंचायतचे सदस्य दीपक वाळकोळी, एसएफआय संघटनेचे पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी, आदिवासी ठाकर संघर्ष समन्वय समितीचे अर्जुन काळे, किसान सभेचे दत्ता गिरंगे, अशोक जोशी, संदीप शेळके, साथी संस्थेचे शैलेश डीखळे, स्वप्निल व्यवहारे, रूपाली काठे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळू काठे यांनी केले. प्रास्तविक रीना मुंढे यांनी केले, तर वाळकोळी यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Nov 12, 2023 Page No. 11
newspaper.pudhari.co.in

## आदिवासी दिनानिमित्त शोधनिबंध स्पर्धा

**मंचर :** जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधत आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र, आंबेगाव यांनी घोडेगावच्या जुन्नर फाटा येथील त्रिमूर्ती भवनमध्ये दि. १० ऑगस्ट ते दि. ५ सप्टेंबरपर्यंत राज्यस्तरीय शोधनिबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली. शोधनिबंध स्पर्धेसाठीचे विषय पुढीलप्रमाणे : मानवी संस्कृती-इतिहास, बदलते स्वरूप व तिचे मानवी जीवनातील स्थान, आदिवासी संस्कृती - बदलते स्वरूप, वैशिष्ट्ये आणि आदिवासी संस्कृती मूल्ये व सांविधानिक मूल्ये यांचा तुलनात्मक अभ्यास, आजच्या कालखंडातील विविध प्रकारच्या अस्मिता व यातून निर्माण होणारे समाज जीवन आणि आपले संविधान, आदिवासी सांस्कृतिक जीवन यातून आजच्या आदिवासी प्रश्नांना भिडता येईल का व कसे. विजेत्या स्पर्धकांना प्रथम क्रमांक ५ हजार रुपये, द्वितीय क्रमांक ३ हजार रुपये, तृतीय क्रमांक २ हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येणार आहेत. तर सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र दिले जाईल. दि. ५ सप्टेंबरपर्यंत शोधनिबंध संस्थेच्या पत्त्यावर पोहचणे आवश्यक आहे. शोधनिबंध पाठविण्याचा पत्ता पुढीलप्रमाणे : त्रिमूर्ती भवन, जुन्नर फाटा, घोडेगाव, ता. आंबेगाव, जिल्हा, पुणे. ४१२४०८.

My Gramin Edition
Aug 12, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

केसरी

## डोळे तपासणी शिबिरात ५० जणांना चष्म्यांचे मोफत वाटप

**भीमाशंकर (वार्ताहर) :** आदिम संस्थेच्या वतीने कोळवाडी (ता. आंबेगाव) येथे मोफत डोळे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये १०८ लोकांची डोळ्यांची तपासणी करून ५० जणांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड, रोटरी क्लब ऑफ कोथरूड व रोटरी क्लब मेट्रो, पुणे यांच्या सहकार्याने आणि आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र यांच्या स्थानिक संयोजनातून प्रौढ साक्षरता वर्ग घेण्यात येत आहे.

साक्षरता वर्गात ८० पेक्षा अधिक महिला व पुरुष साक्षर होत आहेत. मात्र रात्रीच्या वेळी हे साक्षरता होत असल्याने बहुतेक ज्येष्ठ महिला व पुरुष यांना अंकगणित, अक्षरओळख करून घेत असताना जवळचे दिसण्यास येत असल्याने डोळे तपासणी शिबिराचे आयोजन केले. यावेळी साक्षरता वर्गातील नागरिकांनसह या परिसरातील इतर नागरिकही यामध्ये सहभागी झाले.

घोडेगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल जोशी यांनी १०८ जणांची तपासणी केली. यामध्ये काहींना मोतीबिंदू व डोळ्यांचे इतर आजार लक्षात आल्यावर त्या रुग्णांना ग्रामीण रुग्णालयात दाखल होण्यास सांगितले. तर ज्या नागरिकांना जवळचे वाचन करता येईल त्या ५० ज्येष्ठ नागरिकांना जतन फाऊंडेशन पुणे यांच्या मार्फत चष्मे वाटप करण्यात आले. या शिबिराचे संयोजन साक्षरता वर्गाच्या स्वयंसेविका सुप्रिया मते, प्रियंका बुरसे, सुंनदा डगळे, प्रतीक्षा गिजरे यांनी केले. यावेळी आदिम संस्थेचे समीर गारे, प्रा. स्नेहल साबळे, दिपाली खामकर, अमोल गावडे उपस्थित होते.

पुढारी

## कोळवाडी येथे महिलांच्या शिक्षणाविषयी जागृती

कर्वे समाज सेवा संस्थेच्या विद्यार्थ्यांचा उपक्रम

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र या संस्थेच्या वतीने आंबेगाव तालुक्यातील कोळवाडी येथे साक्षरतावर्ग सुरू आहेत. येथील वर्गात ५० पेक्षा जास्त पौढ महिला शिक्षण घेत आहेत. कर्वे समाज सेवा संस्थेच्या विद्यार्थ्यांनी कोळवाडी येथे महिलांच्या शिक्षणाविषयी जाणीव जागृती केली.



कोळवाडी येथे महिलांच्या शिक्षणाविषयी जाणीवजागृती करण्यात आली.

जास्तीत जास्त महिलांनी या वर्गात येऊन अंकगणित, अक्षर ओळख, कायदा साक्षरता, आर्थिक साक्षर व्हावे, यासाठी पुण्यातील कर्वे समाज सेवा संस्थेच्या शहरी, ग्रामीण समुदाय विकास विभागाच्या द्वितीय वर्षाच्या मुलांनी पथनाट्याच्या माध्यमातून जाणीवजागृती केली. यासोबतच विद्यार्थ्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला व लोकांच्या मदतीने गावचा सामाजिक नकाशा काढला. सामाजिक गाणी व महिला, बालक व पुरुषांसोबत त्यांचे सामाजिक जीवन जाणून घेण्यासाठी गटचर्चा केली. पथनाट्याच्या माध्यमातून गावातील प्रमुख समस्या दर्शविण्यात आल्या व त्यावर उपाययोजनाही दाखविण्यात आली. पथनाट्याला गावातील लोकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या वेळी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीतर्फे विद्यार्थ्यांचे श्रीफळ देऊन स्वागत केले. तसेच कोळवाडी येथील साक्षरता वर्गाच्या स्वयंसेविका यांनी पेन देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

या वेळी आदिम संस्थेचे समीर गारे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. कर्वे समाजसेवा संस्थेच्या विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली. कोळवाडी गावचे माजी सरपंच दत्तात्रय बुरसे, ग्रामपंचायत सदस्य अरुण कवठे, आनंद डगळे, उमाताई मते, आदिम संस्थेचे प्रा. स्नेहल साबळे, राहुल कारंडे, साक्षरता वर्गाच्या स्वयंसेविका, कोळवाडी गाव व परिसरातील १०० पेक्षा अधिक नागरिक या प्रसंगी उपस्थित होते.

My Gramin Edition
Nov 8, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## कोळवडी येथे महिलांची आरोग्य तपासणी

**मंचर :** आदिम संस्थेच्या वतीने शिक्षण व आरोग्याविषयी महत्त्वपूर्ण कार्य आंबेगाव तालुक्यात सुरू आहे. संस्था आणि रोटरी क्लब यांच्या वतीने कोळवाडी येथे महिला या रक्तक्षयमुक्त व्हाव्यात, यासाठी संस्थेचे विशेष काम सुरू आहे. कोळवाडी गावातील महिलांची हिमोग्लोबिन तपासणी शिबिर व त्यांना रक्तक्षयाविषयी मार्गदर्शन शिबिर पार पडले. घोडेगाव ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने सुमारे ७५ महिलांची रक्ततपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालयाचे अतुल ठोसर, हेमंत राक्षे, नारोडी येथील आदिम संस्थेच्या व्यवस्थापक दीपाली वालकोळी, अर्जुन काळे, अमोल गावडे, एसएफआय विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी, सरपंच शुभांगी काळे इत्यादी उपस्थित होते. शिबिरासाठी आदिम संस्थेचे सचिव डॉ. अमोल वाघमारे व स्नेहल साबळे यांनी सहकार्य केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तुषार पवार व ग्रामीण रुग्णालय घोडेगाव येथील डॉ. राहुल जोशी यांचे यासाठी विशेष सहकार्य लाभले होते. कार्यक्रमाचे संयोजन सुप्रिया मते, प्रियांका बुरसे, उज्वला मते, सुनिता मते, साक्षी मते, सुनंदा डगळे, पूजा पारधी यांनी केले होते

My Gramin Edition
Oct 7, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

पुढारी

## कोळवाडी येथे १०८ जणांची नेत्र तपासणी

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

आदिम संस्थेच्या वतीने कोळवाडी (ता. आंबेगाव) येथे मोफत डोळे तपासणी शिबिर झाले. या शिबिरामध्ये १०८ लोकांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली व त्यांना मोफत चष्मेवाटप करण्यात आले.

कोळवाडी येथे इनरव्हील क्लब ऑफ निगडी प्राईड पुणे, रोटरी क्लब ऑफ कोथरूड पुणे व रोटरी क्लब मेट्रो पुणे यांच्या सहकार्याने आणि आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र यांच्या स्थानिक संयोजनातून प्रौढ साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले आहेत. या साक्षरता वर्गामध्ये ८० पेक्षा अधिक महिला व पुरुष साक्षर होत आहेत. ते रात्रीच्या वेळी साक्षरता वर्गात उपस्थित राहतात व अंकगणित आणि अक्षरओळख करून घेत आहेत. मात्र, वयाने ज्येष्ठ असलेले महिला व पुरुष यातील अनेकांना जवळचे दिसण्यास अडचणी येत आहेत. या पार्श्वभूमीवर या डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



कोळवाडी येथे मोफत डोळे तपासणी शिबिर झाले.

या शिबिरामध्ये १०४ महिला व पुरुषांची डॉ. राहुल जोशी यांनी तपासणी केली. जतन फाउंडेशन पुणे यांच्याकडून चष्मे उपलब्ध झाले होते. या शिबिराचे स्थानिक संयोजन साक्षरता वर्गाच्या स्वयंसेविका सुप्रिया मते, प्रियंका बुरसे, सुंनदा डगळे, प्रतीक्षा गिजरे यांनी केले. या वेळी आदिम संस्थेचे समीर गारे, प्रा. स्नेहल साबळे, दीपाली खामकर, अमोल गावडे आदि उपस्थित होते.

My Gramin Edition
Nov 13, 2023 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

सामना

## कायद्याची माहिती आदिवासी महिलांना उपयुक्त - ॲड. मंगल तळपे

घोडेगाव, दि. १८ (सा. वा.) - आजही समाजात निरक्षरता मोठ्या प्रमाणात आहे. विशेषतः आदिवासी महिलांमध्ये याचे प्रमाण अधिक दिसून येत आहे. साक्षरता वर्गाबरोबरच महिलांनी कायद्यांची माहिती समजून घेतली पाहिजे, अशी अपेक्षा ॲड. मंगल तळपे यांनी व्यक्त केली.

आदिम संस्कृती अभ्यास संशाधन, मानव विकास केंद्र घोडेगाव रोटरी क्लब कोथरूड यांच्या संयुक्त विद्यमाने कोळवाडी येथे साक्षरता वर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यावेळी ॲड. मंगल तळपे बोलत होत्या. उज्ज्वल तावडे, सत्यजित चितळे, सुहास पटवर्धन, हेमचंद्र दाते, बाळू काठे, उज्ज्वला मते, सुनंदा डगळे, सुप्रिया मते आदी उपस्थित होते.

साक्षरता ही विकासाची पूर्वअट आहे. या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षे रोटरी क्लब व आदिम संस्था आदिवासी भागात साक्षरता वर्गाचे आयोजन करीत आहे. या साक्षरता वर्गात २५ महिला साक्षरतेचे धडे घेत आहेत. उपस्थित महिलांना पाटी, पुस्तक, पेन्सिल व वर्गाला फळा, खडू देण्यात आले आहेत. या साक्षरता वर्गात मूलभूत साक्षरतेबरोबरच आर्थिक साक्षरता, कायदा साक्षरता, आरोग्य साक्षरता याविषयी माहिती दिली जाणार असल्याचे आदिम संस्थेचे बाळू काठे यांनी सांगितले.

Pune Edition
Aug 19, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

प्रभात

## 'जनआरोग्य'चे सक्षमीकरण आरोग्य क्षेत्रातील नांदी

### अशोक पेकारी : असाणेत आयुष्मान सभा

**मंचर, दि. २३ (प्रतिनिधी)** - जनआरोग्य समितीचे सक्षमीकरण आरोग्य क्षेत्रातील नांदी ठरणार आहे, तसेच गावातील आरोग्य,पाणी व स्वच्छता या सेवा सक्षम करण्यासाठी व त्यांचा दर्जा टिकवण्यासाठी आरोग्यवर्धिनी केंद्र पातळीवर असलेल्या जनआरोग्य समितीने पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत अखिल भारतीय किसान सभेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष अशोक पेकारी यांनी व्यक्त केले.

आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, असाणे (ता. आंबेगाव) येथे आयुष्मान सभा पार पडली. यावेळी किसान सभेचे पुणे जिल्हा सहसचिव व कुशिरे बुद्रुक जन आरोग्य समितीचे सदस्य अशोक पेकारी बोलत होते. यावेळी सरपंच खेमा गभाले, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. तानाजी आजने, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, एएनएम, असाणे गावचे पोलीस पाटील, साथी संस्थेचे समीर गारे उपस्थित होते. लोकांसाठी आरोग्य विभागामार्फत आरोग्यवर्धिनी केंद्र पातळीवर पुरविल्या जाणाऱ्या लसीकरण, मधुमेह व रक्तदाब (एनसीडी) रुग्णसेवा, संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवरील उपचार, कर्करोग तपासणी इत्यादी १३ प्रकारच्या सेवांविषयी माहिती देण्यात आली. दरम्यान टीबी मुक्त महिलेचे मनोगत व सत्कार करण्यात आला. डॉ. विजय देसाई यांनी रक्तक्षयविषयी मार्गदर्शन केले. १५ वा वित्त आयोग, पेसा निधी यांचा वापर करून आरोग्य सेवा अधिकाधिक लोकाभिमुख करायला हवी. आपल्या गावातील आरोग्यवर्धिनी उपकेंद्र सक्षमीकरण करण्यासाठी ग्रामपंचायत नेहमीच सहकार्य करण्यास तयार असेल, उपकेंद्रास आवश्यक असणाऱ्या आवश्यक सोयीसुविधा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील, असे आश्वासन पेकारी यांनी दिले.

PuneDistrict, 24 Oct 2023, Page:006
https://epaper.dainikprabhat.com

# कोळवाडीतील साक्षरता वर्गात पंचवीस महिलांचा सहभाग

**घोडेगाव, ता. १८ :** रोटरी क्लब पुणे, कोथरूड व आदिम संस्कृती अभ्यास, संशोधन व मानव विकास केंद्र घोडेगाव यांच्या वतीने कोळवाडी (ता. आंबेगाव) येथे साक्षरता वर्गाचे उद्घाटन केले.

आंबेगाव तालक्यातील कोळवाडी येथे झालेल्या साक्षरता वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ॲड. मंगल तळपे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना साक्षरता वर्गात, आदिवासींसाठी उपयुक्त कायद्यांची माहिती ही समजून घेतली पाहिजे ही अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब कोथरूडचे उज्वल तावडे, सत्यजित चितळे, सुहास पटवर्धन, हेमचंद्र दाते आदी उपस्थित होते. या साक्षरता वर्गात एकूण २५ महिला साक्षरतेचे धडे घेणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन उज्वला मते, सुनंदा डगळे, सुप्रिया मते यांनी केले.

प्रभात

# शरीरसंपदेसाठी पालेभाज्या आवश्यक - डॉ. रमेश लहाने



कोळवाडी : येथे आरोग्य शिबिरासाठी उपस्थित असलेल्या महिला.

**मंचर, दि. ४ (प्रतिनिधी) -** आहारात सर्वांनी पालेभाज्याचा वापर केल्यास शरीर संपदा मजबूत होण्यास मदत होईल, असे मत डॉ. रमेश लहाने यांनी व्यक्त केले .

आदिम संस्थेच्या वतीने शिक्षण, आरोग्यविषयी महत्त्वपूर्ण कार्य आंबेगाव तालुक्यात सुरू आहे. संस्था आणि रोटरी क्लब यांच्या वतीने कोळवाडी (ता. आंबेगाव) येथे सुरू असलेल्या प्रौढ साक्षरता वर्गातील महिला आणि गावातील महिला या रक्तक्षय मुक्त व्हाव्यात यासाठी संस्थेचे विशेष काम सुरू आहे.

कोळवाडीतील महिलांची हिमोग्लोबिन तपासणी शिबिर व त्यांना रक्तक्षयाविषयी मार्गदर्शन शिबिर येथे पार पडले. घोडेगाव ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने सुमारे ७५ महिलांची रक्त तपासणी करण्यात आली. या आरोग्य शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालयाचे अतुल ठोसर, हेमंत राक्षे, नारोडी येथील आदिम संस्थेच्या व्यवस्थापक दीपाली वालकोळी, अर्जुन काळे, अमोल गावडे, एसएफआय विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश गवारी, सरपंच शुभांगी काळे उपस्थित होते.

या शिबिरासाठी समन्वय आदिम संस्थेचे सचिव डॉ. अमोल वाघमारे आणि स्नेहल साबळे यांनी सहकार्य केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तुषार पवार व ग्रामीण रुग्णालय घोडेगाव येथील डॉ. राहुल जोशी यांचे या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संयोजन सुप्रिया मते, प्रियांका बुरसे, उज्वला मते, सुनीता मते, साक्षी मते, सुनंदा डगळे, पूजा पारधी यांनी केले.

PuneDistrict, 05 Oct 2023, Page:015
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत

# शिनोली येथील कातकरी मुलीचे १२ वी परीक्षेत यश

## प्रतिकूल परिस्थितीवर केली मात : अभ्यास, संघर्ष करत मिळवले ७७.६७ टक्के गुण

लोकमत न्यूज नेटवर्क

**घोडेगाव :** शिनोली इंदिरानगर येथील उमा विलास वाघ या आदिवासी कातकरी समाजातील मुलीने इयत्ता १२वीच्या परीक्षेत्र ७७.६७ टक्के गुण मिळविले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अभ्यास आणि संघर्ष करत तिने हे यश मिळवले.



घरची परिस्थिती बेताची असल्याने व आर्थिक अडचणी असल्यामुळे २०१८ मध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमाला ११वीमध्येच शिक्षण सोडायला लागले होते. तिने वडिलांसोबत मासेमारी, शेतमजुरी, दुकानात काम अशी भेटेल ती कामे केली. मात्र, तिची शिकण्याची इच्छा कायम होती. दोन वर्षांपूर्वी स्नेहल साबळे या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये 'महाराष्ट्रातील आदिवासी कातकरी जमातीच्या लोकसाहित्याचा अभ्यास' यावर पीएच.डी. करणाऱ्या प्राध्यापिकेची इंदिरानगरमध्ये उमा वाघची भेट झाली होती. स्नेहल साबळे यांनी तिला पुन्हा अकरावीमध्ये प्रवेश मिळवून दिला व शिक्षणासाठी प्रेरित केले. त्यामुळे या मुलीला बारावीमध्ये ७७.६७ टक्के गुण मिळवता आले.

पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी संस्था तिला आवश्यक ते सहकार्य करणार असल्याचे संस्थेचे सचिव डॉ. अमोल वाघमारे यांनी सांगितले. कार्यक्रमास स्नेहल साबळे, समीर गारे, एसएफआय पुणे जिल्हा अध्यक्ष दीपक वालकोळी, दिनेश वालकोळी, सतीश लोहकरे, जनवादी महिला संघटनेच्या सुप्रिया मते उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 5 May 26, 2024
Powered by: erelego.com

## आमचे भागीदार व समर्थक

## पुढील वर्षातील नियोजन –

१. आंबेगाव तालुक्यात जन आरोग्य समिती बळकटीकरण प्रक्रिया राबविणे
२. मानवनिर्मित देवराई निर्माण करणे
३. आंबेगाव तालुक्यातील ५ गावांमध्ये पेसा ग्रामसभा  सक्षमीकरण प्रक्रिया राबविणे
४. १० गावांमध्ये प्रौढ साक्षरता वर्ग सुरु करणे.
५. जुन्नर तालुक्यातील आंबे या गावात पंचम ग्रामीण विकास प्रकल्प राबविणे
६. विशेषदिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करणे
७. ज्ञानसरिता अभ्यासिका

## काही प्रकल्पांची प्राथमिक तयारी -




**जन आरोग्य समिती बळकटीकरण प्रक्रियेतील काही क्षणचित्रे १. गावडेवाडी येथील गाव बैठक २. गिरवली ज.आ.स. बैठक**




**जुन्नर तालुक्यातील आंबे या गावात पंचम ग्रामीण विकास प्रकल्प राबविण्याच्या तयारीचे क्षणचित्रे १. गावातील नागरिकांसोबत बैठक**

## संस्थेशी संपर्क साधा –

**कार्यालय** - त्रिमूर्ती भवन,जुन्नर फाट्याजवळ,घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे – ४१२ ४०८
**संपर्क** – ९१६८१९२८२३ / ९४०४२३८७७३ / ९७६२१६५१२९
**ईमेल** – adimsanstha2012@gmail.com
**वेबसाईट** – adimresearch.org
**फेसबुक** – facebook.com/profile.php?id=100094296592365&mibextid=LQQJ4d
**इंस्टाग्राम** -
https://www.instagram.com/adim_sanstha2012?igsh=NmN0cGFsNWUzNzRy&utm_source=qr
**युट्युब** – www.youtube.com/@Adim2012
**व्हाट्‌अॅप** - whatsapp.com/channel/0029VaBDIIS4inoiqIkvxI3d

[ (फेसबुक) (इंस्टाग्राम) (युट्युब) (व्हाट्‌अॅप) ]